



बाबांनी पणत्यात पाणी घालून त्या पेटविल्या !



जगा लावावे सत्पथीं । हेचि साईलीलेची कृती ॥



# श्रीसाई वाक्सुधा

एका भगवद्भक्तीवीण ।
किमर्थ इतर साधनीं शीण ।
ब्रह्मदेवही मायेअधीन ।
भक्तीच सोडवण तयाही ॥ ७७ ॥

हो कां ब्रह्मसदन प्राप्ती ।
भक्ती वांचूनि नाहीं मुक्ति ।
तेथेही चुकल्या भगवद्भक्ति ।
पडे तो पुनरावृत्तींत ॥ ७८ ॥

करी व्हावया मायानिरसन ।
उपाय एक भगवद्भजन ।
भगवद्भक्ता नहीं पतन ।
भगवंधनही नाही तया ॥ ७९ ॥

जन म्हणती माया लटकी ।
परी ती आहे महाचेटकी ।
ज्ञानियां फसवी घटकोघटकी ।
भक्त नाचविती चुटकीवरी ॥८०॥

जेथे ठकती ज्ञानसंपन्न ।
तेथे टिकती भाविकजन ।
की ते नित्य हरिचरणीं प्रपन्न ।
ज्ञानाभिमान धन ज्ञानी ॥ ८१ ॥

—श्रीसाईसच्चरित—अध्याय ३९ वा

# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५८ वे] मार्च १९८० [अं. १२

: संपादक :
श्री. क. हि. काकरे,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :
● डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
● श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६-०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं ८०४-बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४४ ३३ ६१

# अनुक्रमणिका – मार्च १९८०


१) संपादकीय — बाबा एक अवतारी पुरुष

२) तर्क निष्फळ अनुभव श्रेष्ठ — श्री. अ. ज. चितांबर

३) कै. शामराव जयकर — श्री शूरसेन जयकर

४) न्या. श्री. एन्. के. पारेख — श्रीसाईनंद

५) श्रीसाईबाबा व संत कबीर — श्री. चकोर आजगावकर

६) ऑपरेशनविना रोगमुक्ती — श्री. स. व्य. कुलकर्णी

७) सर्वव्यापी परमेश्वर श्रीसाई — सौ. सिंधु मुळीक

८) जया मनी जैसा भाव — श्री. अनिल रिसबुड

९) तया तैसा अनुभव — श्री. जे. डी. दळवी

१०) श्रीसाई दर्शन — कु. प्रभा सावंत

११) श्रीसाईलीलाचे लेखक-कवी तहामे संमेलन — ,,

१२) शिरडीवृत्त — डिसेंबर ७९-जाने. ८०

## संपादकीय –

स. न. वि. वि.

# बाबा एक अवतारी पुरुष



महाराष्ट्र ही एक साधु-संतांची, ऋषी-मुनींची अवतारी पुरुषांची भूमी आहे. संत तुकाराम, ज्ञानेश्वर, रामदास अनेक अग्रणी संत या भूमीवर अवतरले. 'बाबा'– एक अवतारी पुरुष. प्रत्यक्ष परमेश्वराचे दुसरे रुपच जणू. द्रष्टे भूत, भविष्य, वर्तमान जाणणारे. गीतेमध्ये कृष्णानें म्हटले आहे की,

'यदा यदाही धर्मस्य ग्लानिर्भवती भारत।
अभ्युत्थानम् अधर्मस्य तदात्मानाम् सृजाम्यहम् ॥'

या उक्ती प्रमाणे जेव्हा, जेव्हा समाजामध्ये अधर्म वाढेल, अन्याय, अत्याचार वाढेल, माणुसकीचा ऱ्हास होईल, असत्याचे साम्राज्य निर्माण होईल. समाजामध्ये खून मारामाऱ्या, चोऱ्या होऊ लागतील, सज्जनांचा छळ होईल, दुर्जनांचा सुळसुळाट होईल, सज्जनाना जगणे ज्यावेळी कठीण होईल, समाजामध्ये अहंकार माजेल, समाजाची अवस्था सुकाणू नसलेल्या जहाजाप्रमाणे दिशाहीन भटकत राहील, ना ध्येय ना प्रारंभ–ना अंत, अशी अवस्था समाजाची ज्यावेळी होईल, समाजामध्ये अशांतता निर्माण होईल, आणि ज्यावेळी समाजाला स्थिरतेची, शांततेची गरज भासेल अशा वेळी सत्पुरुषांचा जन्म होईल, आणि नेमके अशा वेळीच बाबांचे अवतार कार्य सुरु झाले.

सत्याचा, माणुसकीचा, मानवतेचा, न्यायाचा, शांततेचा, स्थिरतेचा, समाजवादाचा समानतेचा अमृत अखिल जगताला पाजणारे ' बाबा ' एक दैवत होत.

अनेक लोक अनेक कारणासाठी बाबांकडे येत असत. दैहिक, (शारीरिक) मानसिक शांततेसाठी, कोणी सुख मागण्यासाठी, कोणी रोगराई बरे करून घेण्यासाठी कोणी मूल मागण्यासाठी. अनेक इच्छा मनात धरून त्या पूर्ण करून घेण्यासाठी मानव त्यांच्याकडे जात असे. पण ' बाबा ' कोण कशासाठी आला आहे हे अगोदरच ओळखत असत.

' जी जी इच्छा भक्त करिती ।
ती ती साईनाथ पुरविती ।। '

या उक्तीप्रमाणे बाबा सर्वांच्या सर्व इच्छा पूर्ण करीत.

त्यांच्याकडे सर्व थरातील, सर्व जाती, धर्मातील, लोक येत. स्त्री-पुरुष हिंदू-मुस्लिम, गरीब-श्रीमंत, प्राध्यापक, वकील, डॉक्टर, बडे बडे पंडित, आंग्ल विद्याविभूषित, मुले येत असत. सर्व लोक मनात इच्छा धरून इच्छापूर्तीसाठी येत.

' बाबां ' जवळ सर्व समान. मुलांना तर बाबा फुलासारखे जपत, त्यांच्याबरोबर कधी कधी खेळत सुद्धा असत. गप्पा मारीत असत. बाबा मागणे मागायला येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला रिक्त हस्ते पाठवीत नसत. शिरडीत बसून ' बाबा ' भक्तांचे संकट ओळखून ते संकट निवारण्याकरिता स्वतः धावत किंवा त्याची पूर्वसूचना देत. ' बाबांना ' परमार्थ साधावयाचा होता. भक्तांना सन्मार्गी लावायचे होते.

' बाबांनी ' अनेक रुपे धारण केली आहेत. राम, कृष्ण, दत्त, विठ्ठल या सर्वात मी आहे असे सांगितले आहे. प्रत्येकाने आपापल्या कुलदेवतेची पूजा करावी म्हणजे मी त्यात आहे असे सांगितले.

शेवटी सर्वांच्या सर्व इच्छा पूर्ण करून बाबांनी आजचा समाजवाद त्याकाळीच अमलात आणला होता.

' बाबांनी ' मंदिर मस्जिद एक केले. हिंदु-मुस्लिमांना एक केले. आपण सर्व एकाच मातेची लेकरें आहोत. ज्याप्रमाणे सूर्य, चंद्र, सर्वांना सारखेच प्रकाश देतात. आंबे व इतर झाडांच्या फळांची गोडी सर्वांना सारखीच लागते. गाईचे दूध ज्याप्रमाणे सर्वांना सारखे प्रिय असते, त्याप्रमाणे आपण सर्व एक आहोत. कोणी

उच्च नाही, कोणी नीच नाही कोणी गरीब नाही कोणी श्रीमंत नाही. स्त्री-पुरुष मुले, आपण सर्व एक आहोत.

'परोपकारार्थम् वहन्ति नद्या
परोपकारार्थम् फलंति वृक्षा ।
परोपकारार्थम् दुहन्ति गौवा
परोपकारार्थम् इदम शरीरम् ॥

असे होते बाबांचे आचरण व तत्व.

बाबांनी जातिभेद मानू नका-'नांदा सौख्यभरे'- अशी शिकवण दिली.

अहंकारी मानवाचे जेव्हा हात टेकतात, मानवी प्रयत्न जेव्हा संपतात, मानवाला जेव्हा मार्ग दिसत नाही, सर्व मार्ग संपतात, बंद होतात, उपाय संपतात, ज्यावेळी मानवाचे विचार संपतात, सर्व काही संपले असे वाटते, त्यावेळी माणसे-'बाबांच्या' जवळ येत असतात. त्यावेळी 'बाबा' त्यांना मातेच्या ममतेने जवळ करीत. दूर लोटीत नसत. असे होते व अजूनही आहे; बाबांचे अवतार कार्य.

☆

## मुंबई-शिरडीतील श्रीरामनवमी उत्सव

● सर्व साईभक्तांना कळविण्यात येते की यंदा शिरडी येथे श्रीरामनवमी महोत्सव रविवार ता. २३ मार्च १९८० ते मंगळवार ता. २५ मार्च १९८० पर्यंत नेहमी प्रमाणे थाटात साजरा केला जाईल. सर्व साईभक्तांनी हेच निमंत्रण समजून महोत्सवास हजर राहून संस्थानला शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वतोपरीने सहकार्य द्यावे ही विनंती. नेहमीप्रमाणे श्री. अनंत-राव आठवले यांची किर्तन-प्रवचने होणार असून अनेक गायक-भक्त मंडळी आपापली हजेरी लावणार आहेत.

● संस्थानच्या 'साईनिकेतन' डॉ. आंबेडकर मार्ग दादर येथल्या कार्यालयातही सोमवार दि. २४ मार्च १९८० रोजी रामनवमी उत्सव साजरा केला जाईल व दुपारी १२ वा. आरती व प्रसादाचा कार्यक्रम होईल. तत्पूर्वी गायन-भजन-प्रवचन इ. कार्यक्रम होतीलच.

# तर्क निष्फळ, अनुभवच श्रेष्ठ

—श्री. अनंत जयदेव चितांबर
तांबे ब्लॉक्स, अहमदनगर

● निराकार, अथांग, सीमारहित करुणासागर उचंबळला व त्याने अतर्क्य, विभूतिमान् असे एक मानवी स्वरुप धारण करून ते शिरडी या खेडेगावात प्रगट केले. ह्या विभूतीचे स्वागत कै. म्हाळसापति यांनी 'साई' हे त्या विभूतीस नामाधिधान देऊन केले, परमेश्वर होऊन स्वतः त्याच्या अनन्य भक्ताकडे जातो हे प्रत्यक्ष उदाहरण आपण ह्या काळात पाहात आहोत. ईश्वरसाधनेचे फळ काय असते हे उघड्या डोळयानी पाहून नुसते तर्क करीत बसण्यापेक्षा प्रत्यक्ष अनुभव घेण्याच्या प्रयत्नात रहावे हेच कल्याणकारक होय,

## परमेश्वराचे अवतरण कशासाठी ?

साक्षात् परमेश्वर पुढे उभा राहिला तरी सामान्य मनुष्याचा त्याच्यावर विश्वास बसत नाही. या करिता परमेश्वरासही आपल्या अगम्य लीला दाखवाव्या लागतात. श्रीसंत ज्ञानेश्वर यांनाही रेड्याच्या मुखातून वेद म्हणवून घेण्याचा चमत्कार दाखवावा लागला. यात संतांचा हेतु, अज्ञजन परमेश्वरावर नसलेला विश्वास ज्या वृत्तीने दाखवितात ती त्यांची वृत्ति पालटून त्यांना योग्य मार्गावर आणणे हा असतो. श्रीसाईनाथांच्या सारख्या अवधूतांचे अवतरण, जगातील मानवांचे दुःख, त्यांची संकटे व द्वेषभावना ही नाहिशी करून, त्यांच्यात खरी धर्मभावना निर्माण करणे हा असतो.

## जगी सर्व सुखी असा कोण आहे ?—संत रामदास

आपल्या दुःखाचे मूळ कशात आहे ? कर्माप्रमाणे फळ हा सिद्धांत आहे. नैसर्गिक आपत्ति मनुष्याच्या हाती नसतात हे खरेच. पण हेहि तितकेच खरे की, धनसंपत्ति व इतर वैभव ही भरपूर प्रमाणात जवळ असूनही, मनुष्य स्वसुखाच्या स्वार्थी हेतुसाठी अनेक दुष्कृत्ये करू लागतो व आपली नवीन कर्मे उत्पन्न करतो. प्रत्येक कर्माचे फळ भोगावेच लागते. परमेश्वरास तो विसरतो. मग त्यास मनःशांति मिळते काय ?

असेही दिसून येते की, ह्या दुष्ट व उन्मत्त जगात सज्जनपणाने व नीतीने वागणाऱ्या मनुष्यावरही अनेक संकटे कोसळतात व त्यातून त्यास मार्ग काढावा लागतो. माणसे माणसांना ओळखत नाहीत.

वर नमूद केलेली दोन्हीही, दुष्ट व सुष्ट माणसे, ते ईश्वरास शरण गेल्यास, त्यांच्यामध्ये जसा भाव असेल त्याप्रमाणे, परमेश्वर त्यांना सहाय्य करून त्यांना संकटातून सोडवितो हा तर्क नसून अनेकांचा प्रत्यक्ष अनुभव आहे. दुष्टांच्या हृदयातही पालट करून सुष्टांचे प्रतिपालन त्यांचे दुष्टांपासून संरक्षण श्रीसाईबाबा करतात. श्रीसाईशांना शरण गेल्यास आश्चर्यकारक रीतीने भक्तांचे ते सर्वतोपरी रक्षण करतात हे नव्याने सांगणे नको. बाबांचा महिमा अगाध आहे. तेव्हा निर्भयपणे सत्पथावरच रहा, घाबरू नका, फक्त माझ्याकडे या असे बाबांचे सांगणे आहे.

एका प्रांताच्या राज्याचे दोन मुख्यमंत्री बाबांच्या समाधीवर अभिषेक करून दर्शन घेऊन गेले आणि काही काळानंतर ते दोघेही मुख्यमंत्रीपदावरून पदच्युत झाले. ह्या घटनेचा उल्लेख करण्याचा हेतु एवढाच की, बाबांना ओळखणे सोपे नाही. अंतरंगांचे संशोधन झाले पाहिजे. बाबा सर्व काही ओळखतात. सत्य अनुभव ही फार वेगळी गोष्ट आहे.

बाबांच्या मशिदीत जरा शांत रीतीने बसा व विविध धर्मांचे व विविध पंथांचे लोक कोणत्या भाषेत, कोणत्या नावाने बाबांच्या सन्निध बसून जप करतात ते प्रत्यक्ष ऐका व पाहा. आश्चर्याने थक्क व्हाल व हे कोडे तर्काने कधी तरी सुटेल काय? भक्तांचा तो भाव पाहिला की मन विरघळून जाते व बाबांच्या ठिकाणी रममाण होते.

एक भक्त 'साईजगदंब' हा जप करीत असताना मी मशिदीत प्रत्यक्ष ऐकला. त्यावेळीं मी रामरक्षा म्हणत होतो. अशा जपांची यादी द्यावयाची म्हटली तर ती लांबेल. ह्या यादीत कुराणातील कलमांचा व भगवद्गीतेचाही समावेश आहे एवढे मात्र विसरू नका.

मी बाबांना समक्ष पाहिले म्हणून मला अनेक भक्त बाबा कसे दिसत होते असे विचारतात. बाबांच्या चरणांचे दर्शन लहानपणी घेतलेले जेव्हा मी ध्यानात आणतो तेव्हा मनःचक्षूसमोर त्यांची मूर्ति खिळलेली असते. लहानपणापासून बाबांनी जी ज्ञानस्फूर्ति अंतःकरणात निर्माण केली. त्या स्फूर्तीतून होणारे बाबांचे दर्शन वर्णन करणे शक्य नाही. जे भाव निर्माण होतात. त्या भावातून बाबा कसे दिसतात ते ऐका :

१. स्वस्वरूपी दंग.

२. मुमुक्षूना आत्मबोधाचे भान त्यांच्या हृदयात निर्माण करणारे स्वरूप.

३. बाबांच्या देहातच ब्राम्हीस्थितीचे साक्षात् दर्शन.

४. देह असूनही विदेही अवस्थेचे साक्षात् दर्शन.

५. गांभीर्य व कारुण्य यांचा संगम असलेले अतर्क्य निवासस्थान.

६. क्षमा व शांति यांचे भक्ताचे हृदय पालटविणारे दर्शन.

७. दंभ व अहंकार नाहीसे करणारे दर्शन.

८. संसार दुःख विसरविणारे दर्शन.

९. चरण दर्शनाने शब्दातील सुख प्रदान करणारा प्रभु.

बाबांना प्रीतिपूर्वक भजल्याने बाबा 'बुद्धियोग' देतात व उद्धाराचा मार्ग दाखवितात यात शंका नाही. 'मला शरण आला आणि वाया गेला असे कधीही होणार नाही' असे बाबांचे वचन आहे.

शेवटी 'उपजला भावो, तुझे कृपे सिद्धी जावो' (संत तुकाराम) हीच बाबांच्या चरणी नम्र प्रार्थना.


श्रीसद्गुरु साईनाथ कृपामठ, पुणे

## जिल्हाधिकाऱ्यांचे हस्ते होणारा सोहळा

● श्री शिरडी क्षेत्री असलेल्या श्रीसाईबाबांच्या समाधीमंदिरातील सिंहासनस्थ मूर्तीप्रमाणेच हुबेहूब चितारलेले साडेसहा फूट उंच व साडेचार फूट रुंद असे तैलचित्र श्रीसद्गुरु साईनाथ कृपा मठ, स्वार गेट पुणे यांना भेटीदाखल देण्यात आले आहे. सुमारे तीन महिने सोवळे नेसून ते साईभक्त चित्रकार श्री. कुलकर्णी यांनी चितारले व साईभक्त श्री. दिलीपकुमार गोपाळदास बार्शीकर यांनी या भव्य चित्रास छानदार काचफ्रेम करून दिली आहे. या भव्य चित्राचे अनावरण येत्या गुढी पाढव्यास सोमवार ता. १७-३-८० रोजी सायंकाळी ५ वा. श्री. अजित निंबाळकर, कलेक्टरसाहेब पुणे जिल्हा यांचे शुभ हस्ते मठात संपन्न होत आहे. तरी साईभक्तांनी या समारंभास हजर राहून कार्यास शोभा आणावी अशी विनंती मठ संचालक श्री. शामराव उर्फ अण्णासाहेब लोंढर हे करतात.

द्वारकामाईतील श्रीबाबांच्या चित्रछबीचे जनक

# ✣ कै. शामराव जयकर ✣



— लेखक —

—श्री. शूरसेन शामराव जयकर,
'साईकुटीर' (१ ला मजला) तेजपाल स्किम
५ वी गल्ली, विलेपारले (पूर्व) मुंबई ५७

**शिरडीत-द्वारकामाईमधे श्री धूनी समोरच असलेल्या श्रीसाईनाथांच्या चितारलेल्या अप्रतीम चित्राचे चित्रकार कै. जयकर यांचे वयोवृद्ध चिरंजीव श्री. शूरसेन यांनी लिहिलेले आपल्या वडिलांचे हे अल्पचरित्र; ते त्यांच्या या महिन्यातील पुण्यतिथी निमित्य प्रथमच श्रीसाईलीलेत प्रकाशित करीत आहोत. श्रीबाबांचे साक्षात् अनेकदा दर्शन घेतलेले श्री. शूरसेन यांचे वय आज ८० चे पुढे असून त्यांची प्रकृतीही चांगली आहे.**

● कै. शामराव रामचंद्र विनायक जयकर ह्यांचा जन्म अंदाजे १८६४/६५ साली तत्कालीन मुंबईतील काळबादेवी रस्त्यावरून लोहार चाळ रस्त्याने क्राफर्ड मार्केटकडे जाणाऱ्या स्वतःच्या वाडवडिलांच्या घरात एका सुखवस्तू पाठारे प्रभू कुटुंबात झाला.

शामरावांचे आजोबा विनायक हरीशंकर जयकर हे तत्कालीन ब्रिटीश राजवटीत एक प्रथितयश कायदेपंडीत होते. शामरावांचे वडील, रामचंद्र, त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षीच वारले, व शामराव, आई, धाकटे तीन बंधू व एक बहीण ह्यांच्यासह त्यांचे मामा बाबासाहेब अजिंक्य ( भाऊ रसूलचे नातू ) ह्यांच्या घरी आश्रयाला आले. शामरावांचा शिक्षणक्रम तत्कालीन मिशन स्कूलमध्ये झाला व मिशन ट्रेनिंगमुळे त्यांचे इंग्लिशचे ज्ञानही वरच्या दर्जाचे होते. लहानपणापासून त्यांना चित्रकलेचा विलक्षण नाद होता, व त्यावेळी कुणाचेही उत्तेजन नसतानाही त्यांनी आपला व्यासंग चालू ठेवला. त्यांचे मामा बाबासाहेब अजिंक्य हे चार गावे-मालाड, अकुर्ली, भाईंदर इ. ह्यांचे खोत, व पोर्ट ट्रस्टच्या अर्ध्या धक्याचे मालक होते. ( पोर्ट ट्रस्टच्या एका धक्क्याला अजूनही भाऊचा धक्का म्हणून सर्व ओळखतात. ) स्वभावाने बाबासाहेब बरेच कडक होते, पण अक्कलकोट स्वामींचे निस्सिम भक्त होते. लहानपणी शामरावांचा कान अतिशय दुखत असे, तेव्हा आमच्या आजीने बाबासाहेबांना, शामरावांना स्वामींच्या दर्शनास घेऊन जाण्यास सांगितले. बाबासाहेबांनी शामराव व इतर आप्त मंडळीना घेऊन अक्कलकोटला प्रयाण केले, पण तिथे शामरावांना बिऱ्हाडी ठेऊन मंडळी महाराजांच्या दर्शनास गेली. तिथे गेल्याबरोबर शामराव कुठे आहे असे महाराजांनी बाबासाहेबांना विचारले. शामराव येत नाही, तुफान करतो असे सांगितल्यावर, त्याला घेऊन या असे महाराजांनी फर्मांविले. पुढील हकिगत वडिलांच्या शब्दात अशी की वडिलांना महाराजांकडे नेताना त्यांचा कान दुखत असल्यामुळे त्यांनी रस्त्यात आरडा ओरड व तुफान केले, पण महाराजांच्या समोर गेल्या बरोबर वडील महाराजांच्याकडे बघतात व महाराज वडिलांच्याकडे बघतात. तोपर्यंत वडिलांचा कानाचा क्लेशदायक ठणका बंद झाला.

वयाची विशी गाठल्यानंतर शामरावांच्या मनात बाबासाहेबांपासून स्वतंत्र रहाण्याचे विचार घोळू लागले. व ते योग्य संधीची वाट पाहू लागले. नेहमीप्रमाणे उन्हाळयाच्या दिवसात बाबासाहेब अजिंक्य मालाडमधील त्यांच्या घरात हवा पालटण्यासाठी गेले. ही संधी साधून एक दिवस भल्या पहाटे उठून शामरावांनी मालाड ते अंधेरी पायी प्रवास केला. त्या काळी मालाड व अंधेरी मध्ये स्टेशन नव्हते. दाट जंगल होते, त्या जंगलात हिंस्र पशूंचा बराच संचार होता, व काळोखात प्रवासही धोक्याचा होता. पण शामराव निधड्या छातीने अंधेरी स्टेशनपर्यंत चालत आले, व तिथून लोकल गाडीने मुंबईस येऊन भावोजी म्हणून त्यांचे काका होते त्यांच्या घरी दाखल झाले. आमचे चुलत आजोबा त्यावेळी मुंबई म्युनिसीपालिटीत नोकरीला होते व फार कष्टाळू होते पण आमची चुलत आजी थोडीशी उधळ्या

स्वभावाची होती. म्हणून भावोजी नेहमी पैशाच्या बाबतीत ओढगस्तीत असत. तेव्हा शामरावांनी त्यांना दिलासा देण्याकरिता त्यांच्याकडे असलेले घराण्याचे सर्व कागद भावोजी जवळ दिले. शामराव स्वभावाने फार भाविक होते. ते त्यावेळी दोन गुरूंना मान देत असत. वर सांगितल्याप्रमाणे शामरावांनी मामांचे घर सोडल्यावर आप्तेष्टांमध्ये अनेक तर्क कुतर्क वावरू लागले तेव्हा एका गुरूंनी त्यांचे लग्न जुळविण्याचे ठरविले व मुलीची शोधाशोध करताना आमच्या मातोश्री (बापूजी नारायण तळपदे, पालव रोड यांची जेष्ठ कन्या) ह्या रुपाने गोऱ्या व सुंदर आढळल्यावर वडील नातेवाईकांनी त्यांना पसंत करून शामरावांचे लग्न लावून दिले. लग्नानंतर शामरावांना त्यावेळी भाटिया ज्ञातीत एक महाराज होते, त्यांच्याकडे चित्रकार म्हणून पाऊणशे रुपयांची नोकरी लागली व त्यांनी कुंभार तुकडा गल्लीत स्वतंत्र जागा घेऊन काही काळ संसार केला. शामरावांची चित्रकलेतील प्रगती त्यांचे पणजोबा, घारोजी ह्यांनी लक्षात घेतली. घारोजीना गुजराथी समाजात बरीच मानमान्यता होती, व शामरावांना घेऊन घारोजी श्री. लक्ष्मीदास खिमजी नावाच्या त्या समाजातील एका मान्यवर गृहस्थाकडे घेऊन गेले. शेठ लक्ष्मीदास खिमजींनी घारोजींचे चांगले स्वागत करून शामराव कोण म्हणून विचारले. तेव्हा ते आपले पणतू असून चित्रकलेत बरेच प्रवीण असल्याचे सांगितल्यावर लक्ष्मीदास खिमजीनी शामरावांना विचारले की त्यांनी शिफारस पत्रे दिली तर ते काठेवाडात जातील काय ? शामरावांनी तात्काळ तयारी दर्शविल्यावर शेठ लक्ष्मीदास खिमजीनी श्री. लल्लूभाई सामळदास, जे राजकोटला रेव्हेन्यू ऑफिसर होते, त्यांच्या नावावर बरीच शिफारस पत्रे दिली. शामराव राजकोटला गेले तेव्हा श्री. तखतसिंग म्हणून राजकोटचे अधिपती होते. श्री लल्लूभाई सामळदास ह्यांनी शिफारस पत्रे पाहून शामरावांना काही पेंटिंगचे काम दिले व सर प्रभाशंकर पट्टणी हे त्यावेळी युवराज भाऊसिंग ह्यांचे शिक्षक होते त्यांच्याकडे शामरावांची जेवण्या-खाण्याची व्यवस्था केली. शामरावांनी पेंटिंगचे काम सुरू केले व संध्याकाळी श्री. लल्लूभाई सामळदास व त्यांची मंडळी तिथे आली असताना थोड्याच वेळात शामरावांनी फोटो प्रमाणे हुबेहूब तैलचित्राचे केलेले बरेच काम पाहून चकित झाली. त्यापूर्वी काठेवाडात बरेच युरोपियन चित्रकार येऊन पैसे कमावून गेले होते. पण एका भारतीय चित्रकाराचे कौशल्य पाहून त्या वेळच्या लोकसमाजात बराच बोलबाला झाला. श्री. लल्लूभाई सामळदास ह्यांनी शामरावांची चित्रकला पाहून त्यांची राजकोट अधिपती तख्तसिंग ह्यांची मुलाखत करविली. श्री. तख्तसिंग ह्यांनी त्यांना काही काम दिले. शामरावांचे काम पाहून तख्तसिंग इतके खूष झाले की काय वाटेल ते माग म्हणून त्यांनी त्यांना सांगितले. तख्तसिंग हे एक गुणज्ञ व उदार अंतकरणाचे राजे होते, व शामरावांनी सांगितले असते तर त्यांना दरबारातील

मानकऱ्याची जागा पण मिळाली असती. पण मी परत येईन तेव्हा आपणास भेटेन असे सांगून कामाचा मोबदला मिळाल्यावर शामराव मुंबईस परत आले. दुसऱ्या खेपेस शामराव राजकोटला गेले तेव्हा तिथली राजवट बदलली होती. तख्तसिंग स्वर्गवासी होऊन भाऊसिंग गादीवर आले होते, व त्यांचे जुने शिक्षक श्री. प्रभाशंकर पट्टणी दिवाण झाले होते. भाऊसिंगांच्या अमदानीतही शामरावांना बरेच काम मिळाले. पण भाऊसिंग बरेच हिशेबी असल्यामुळे त्यांना प्राप्तीचे मान बरेच कमी पतकरावे लागले. काठेवाडात फेऱ्या करताना एक मुलगी व मुलगा अशी सुलक्षणी मुले झाली. पण दोन्ही मुले लवकरच निवर्तली. नंतर वडील बंधू विरसेन यांचा जन्म झाला, व प्रस्तुत लेखकाच्या जन्माच्या वेळी काठेवाडात मिळणारे काम संपुष्टात आले. त्या नंतर काही वर्षे मुंबईत काढल्यावर शामरावांना अक्कलकोट संस्थान रिजन्सीमध्ये अक्कलकोटच्या राणी साहेबांचे काम मिळाले. त्यावेळी सोलापूरचा कलेक्टर श्री. मेकानकी नावाचा आय. सी. एस अक्कलकोटचा पोलिटिकल एजंट होता व शामरावावर त्याची चांगली मर्जी होती पण अक्कलकोट संस्थानच्या प्रधान मंत्र्याना शामरावांचे संस्थानमधील वाढते प्रस्थ पाहून गव्हर्नर साहेबांशी पत्र व्यवहार करून पोलिटिकल एजंटाची बदली करविली. आपला संस्थानातील मोठा आधारस्तंभ ढळलेला पाहून शामरावांनी संस्थानमधून आपले बिऱ्हाड हलविले.

शामरावांनी नंतर मुंबई व पुणे येथे काही वर्षे काढली; १९०६ साली खानबहादूर खंबाता म्हणून पुणे लष्करमधे एक वजनदार पारशी गृहस्थ होते त्यांच्या आग्रहावरून काही काळ पुणे शहरात व नंतर १९१६पर्यंत लष्करमधे कायम वास्तव्य केले. लष्करमधे रुस्तुमजी घड्याळी म्हणून एक घड्याळे व दागदागिन्यांची पेढी होती, तेथे खंबाता साहेबांच्या शिफारशीप्रमाणे फॅन्सी पोर्टेटस् ठेवण्याचा क्रम, सुरु केला. पुण्यात त्यावेळी पावसळयात गवर्नर साहेबांचा मुक्काम असे, म्हणून बरेच राजे रजवाडे पुण्यात मुक्काम करीत व रुस्तुमजी घड्याळींच्या पेढीवरुन जाताना आतील तैलचित्रे पाहून पेढीमधे प्रवेश करीत व एकादे चित्र खरेदी करीत, व दुकानातील दागिनेही खरेदी करीत. अशा रीतीने खाजगी कामे, दुकानातील चित्रे व प्रसंगी शिकवण्या करून शामरावांनी संसार चालविला. ह्या वेळीं शिरडी साईबाबा म्हणून एका साक्षात्कारी विभूतीचे वास्तव्य आहे म्हणून त्यांच्या मेव्हण्यांनी ( कै. क्रिकेटर वामन बापूजी तळपदे ) माहिती सांगितली. पण १९१२ साली शामरावांचे स्नेही व साईबाबांचे भक्त कै. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान ह्यांनी शामरावांना स्वता शिरडीस जाऊन श्रीसाईबाबांचे चित्र काढावे म्हणून विनंती केली, व जरुर ती ओळख व मदतही दिली. त्यापूर्वी

श्रीसाईबाबांचा शिळेवर बसलेले असा एकच फोटो उपलब्ध होता. शामरावांनी साईबाबांच्या भक्त मंडळींची मदत घेऊन बाबांचे तैलचित्र मशिदीत बसून काढण्याची परवानगी घेतली. शामरावानी पेन्सिल स्केच घेऊन साईबाबांचा चेहरा प्रथम रंगविला व दिक्षितांच्या वाड्यात बसून बाकीचे काम पूर्ण केलें. श्री. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान ह्यांच्या करिता काढलेले साईबाबांचे तैलचित्र सध्या काकासाहेब दिक्षित यांचे चिरंजीव बाबासाहेब पारल्यास रहातात त्यांच्या घरी आहे. त्याशिवाय काकासाहेब दिक्षितांसाठी काढलेले तैलचित्रही त्यांच्या पूजेत आहे. सुरवातीस साईबाबांचा स्वभाव फार कडक व चेहराही उग्र असे. पण वयोमानाप्रमाणे त्यांच्या स्वभावातही सौम्य पणा आला. शामराव त्यानंतर २–३ वेळेस शिर्डीस गेले होते. १९१७ साली शामरावांनी एक तैलचित्र स्वतः पूजेसाठी काढले व साईबाबांच्या हाती दिले. ह्या चित्रात वयाप्रमाणे बाबा एक वृद्ध विभूती दिसत. साईबाबांनी त्यांच्या हाती दिलेले हे चित्र 'चावडी उपर लगाव' म्हणून शामरावांना सांगितले, शामरावांना त्याचा अर्थ लागला नाही, व त्यांच्या मनाचा पण विसर झाला. पुढे साईबाबा १९१८ सालच्या विजया दशमीस समाधिस्त झाले. नंतर १९२५–२६ साली बाबांचे भक्त-श्रेष्ठ हरी सिताराम दिक्षित, रावबहादूर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान वगैरे मंडळीनी शामरावांकडे ते तैलचित्र बाबांच्या बैठकीच्या जागेत लावण्या करिता मागितले. तेव्हा शामरावांना फार आनंद झाला व तैलचित्रास व्यवस्थित वारनिश, कांच, फ्रेम वगैरे करून त्यांच्या स्वाधीन केले. तेच तैलचित्र आजतागायत द्वारकामाईत धुनी समोर बाबांच्या बैठकीच्या जागी आहे, त्यातील जिवंतपणा शब्दात वर्णन करून सांगता येणार नाही.

सन १९१७ साली शामरावांना धंद्यातील काही कटू अनुभव आला. व मधु-मेहाची पीडा ह्याच्या शमनार्थ ते सहकुटुंब शिरडीस ८/९ महिने वास्तव्य करून होते. त्या अवधीत त्यांचा रघुनंदन नावाचा ५ वर्षाचा गौरवर्णी सुंदर मुलगा गोवरामुळे देवलोकी गेला. मृत्यू आधी हा मुलगा सर्व दिवस साईबाबांच्या जवळ बसत असे व आरतीच्या वेळी भालदाराप्रमाणे दरबारात उभा राही. रघुनंदनच्या मृत्यूनंतर आमचे वडील बंधू वीरसेन मुंबईस नोकरी धंद्याकरिता रवाना झाले. थोड्या दिवसांनी मुलाच्या मृत्यूमुळे शिरडीलो विटलेल्या आमच्या मातोश्रीनी प्रस्तुत लेखक व सहा भावंडांसह मुंबईस प्रयाण केले. शामराव त्यानंतर जवळ जवळ तीन महिने शिरडीस होते. कै. सारजाबाई चांदोरकर ह्यांनी शामरावांची उत्तम व्यवस्था ठेविली होती. त्याबद्दल त्यांचे उपकार कातड्याचे जोडे करूनही फिटण्यासारखे नाहीत. त्या अवधीमध्ये कै. डॉ. पिल्ले ह्यांच्या गैरहजेरीत शामरावांना बाबांची चिलीम भरून देण्याची संधी

लाभली. त्या अवधीत बाबांच्या काही उद्‌गारातील खुलाशामुळे शामरावांच्या सांगण्यावरून रघुनंदनच्या मृत्यूमुळे मातोश्रींच्या साईबाबांच्या बद्दलच्या भावना जरा कडवट झाल्या होत्या. त्याबद्दल मातोश्री आम्हा सर्व मुलांना सांगत की त्या स्वतः जरी काही बोलल्या तरी आम्ही मुलांनी साईबाबांबद्दल काहीही गैर उद्‌गार करू नये.

सन १९१७ साली पावसाळयात शामराव मुंबईस परत आल्यावर त्यांचे गुजराथी समाजातील ओळखीच्या मंडळीत येणे जाणे सुरू झाले व पुढल्या वर्षी सांताक्रूझमध्ये शेठ नरोतमदास भानजी म्हणून एका श्रीमान कापडाच्या व्यापाऱ्याकडे त्याच्या बंगल्यात एक स्वतंत्र खोली काम करण्यास मिळाली व एकवेळ जेवणखाण व त्याने दिलेल्या फोटोप्रमाणे तैलचित्रे काढणे असे काम मिळाले. श्रीमान नरोत्तम सेठजींच्या आश्रयाखाली शामरावांनी १९२२ पर्यंत बरेच काम केले. त्या अवधीत आम्ही सर्व मंडळी गिरगावातून माहीम-सांताक्रूझ व विलेपारले असे स्थलांतर केले, दरम्यान जागतिक मंदीमुळे शामरावांचे नरोत्तम शेठजींच्याकडचे आश्रयस्थान सुटले. शामराव जसे चित्रकार होते त्याप्रमाणे मूर्तिकारही होते. पारल्यास असताना पारले टिळक विद्यालयासाठी १९२३ साली गणपती उत्सवानिमित्त श्रीगजाननाची उत्तम मूर्ति तयार करून दिली, ती तत्कालीन शाळाप्रमुख व उत्साही विद्यार्थीवर्ग ह्यांनी समारंभाने आमच्या निवास स्थानातून नेऊन तिची प्राणप्रतिष्ठा केली. पुढील वर्षी लोकमान्य सेवासंघा तर्फे टिळक मंदिरातही गणेशोत्सवासाठी शामरावांच्या हस्ते गणेश मूर्ति करविण्यात आली, व त्यावेळी इतरही बऱ्याच मूर्ति त्यांनी बनविल्या. या वेळी तैलचित्र काढण्यास कुणी विचारले तर ते स्वखुशीने काम स्वीकारीत; पण मुले कमावती झाल्यामुळे पैशाच्या बाबतीत त्यांना विशेष काळजी राहिली नाही. शामराव टिळकमंदिरासमोर श्री. साळवींच्या घरात असताना श्री. अंतरकर म्हणून एक श्री. रामदास स्वामींचे भक्त होते त्यांनी रामदास स्वामींचे तैलचित्र काढण्याबद्दल विचारले तेव्हा श्री रामदास स्वामी गुहेबाहेर उभे आहेत व दुरून श्री. शिवाजी महाराज काही मावळयांसह त्यांना भेटावयास येत आहेत असे सुंदर चित्र काढून दिले, व श्री. अंतरकराना ते फार आवडले.

शेट नरोत्तमदास भानजी यांच्या आश्रयाला असताना १९१९ मधे शामरावांची भावनगरला शेठजींच्या निवासस्थानी एक फेरी झाली व तिथे श्री प्रभाशंकर पट्टणी व त्यांची मंडळी यांची पुन्हा एकदा मुलाखत झाली. त्यानंतर १९२२ साली शामराव, चि. चंद्रसेन यांच्या दुखण्यात लोणावळयास हवेसाठी जाऊन आले, हे त्यांचे मुंबई बाहेरील शेवटचे पाऊल. श्री. चंद्रसेन हे रुपाने गोरे व उंच बांध्याचे असून उत्तम क्रिकेटर होते. दुर्दैवाने १९२८ सालीच त्यांचा मृत्यू झाला, व पुढच्याच वर्षी सर्वांत

कनिष्ट चिरंजीव श्री. रामकृष्ण ह्या सावळया रंगाच्या पण बोलक्या स्वभावाच्या मुलाचे नवज्वराने निधन आले. हे दोन मृत्यू शामरावांच्या अगदी जिव्हारी लागले, तरीपण घरगुती आयुष्यक्रमात त्यांनी कसेबसे दिवस काढले, व चि. दिनकर याच्या लग्नात पुढाकार घेऊन त्यास गृहस्थाश्रमी बनविले. ह्या सुमारास प्रस्तुत लेखकाचे, पारले, तेजपाल स्कीममधे छोटेसे घर बांधून झाले होते. तेव्हा जागेची टंचाई लक्षात घेऊन मी आपल्या घरात स्थलांतर केले, व शामरावांनी पण दोघां मुलांचे देहावसान, व इतर घरगुती कारणामुळें, श्री. साळवी यांचे घर सोडून श्री. ठाकरे नावाच्या गृहस्थांच्या घरी स्थलांतर केले. या घरात असताना आमचे सहावे बंधू श्री. सुरेंद्र यांच विवाह वॉलेस कंपनीतील श्री. विठ्ठलराव नवलकर यांच्या कन्येशी झाला. त्या समयी अस्थीर प्रकृतीमानामुळे वडील व मातोश्री लग्नमंडपात हजर नव्हते, व लग्नसमारंभ वडील बंधू वीरसेन यांच्या पुढाकारात पार पडला. श्री. वीरसेन यांनी १९३७ साली तेजपाल स्कीममधेच स्वतःचे घर बांधले. तेव्हा शामराव व मातोश्री धाकट्या मुलांसह धैर्यनिवास नामक पार्क रोडवरील घरात रहावयास गेले. इथे त्यांची प्रकृती मधुमेहाने खालवत चालली. ह्याच्या अगोदर रेळे नावाचे वैद्य मुंबईहून पारले येथे रहावयास आले, ते दत्तभक्त होते त्यांनी वडिलांची तैलचित्रे पाहिली, व त्यांच्याकडून त्यांच्या गुरूंचे एक, व श्री दत्ताची बरीच मोठ्या साईजची पेंटिंग्ज करून घेतली, वडील श्रीदत्ताची पेंटिंग्ज फार सुंदर काढत. सुरवातीसच अत्यंत सात्विक भाव असून फार सुंदर चेहरा काढणे, हे त्यांचे वैशिष्टय असे.

तैलचित्रांखेरीज शामरावांच्याकडे एक जबरदस्त कला होती ती म्हणजे हस्तिदंतावरील, जलरंगातील व्यक्तिचित्रे. तैलचित्रे काढणारे अनेक नामांकित चित्रकार होऊन गेले, पण जलरंगांने हस्तिदंतावर, आंगठीमध्ये लॉकेटसमध्ये रहाणारी, व काही त्याहून जरा मोठी वेगवेगळया साईजची केवळ ठिपक्या ठिपक्यांनी काढलेली, पण दुर्बिणीशिवाय ठिपके न दिसणारी अशी पोर्टेटस, किंवा ती काढणारे चित्रकार मी तरी मुंबईत पाहिले नाहीत. आंगठीत रहाणाऱ्या साईझ पासून साधारण २½–३ इंचीचे वेगवेगळया साईजचे २९ नमुने एकत्र करून एका फ्रेममध्ये बसविलेले आहेत, व ते सर्व ५०–७५ वर्षापूर्वी केलेले असून त्यात काहीही फरक पडलेला नाही, व त्यातील रंगसौंदर्य व व्यक्तींचे साम्य पहाणाऱ्याची दृष्टी खिळवून ठेवते. हे हस्तिदंत शामराव कुठून आणीत, त्याला लागणाऱ्या वेगवेगळया साईजच्या कांचा ते कुठून मिळवीत, किंवा ही कलाच त्यांच्याकडे कशी आली या बद्दल काहीच माहिती उपलब्ध नाही, पण ह्या हस्तिदंती चित्रांची बरोबरी कुणीच करू शकणार नाही, हे मात्र नक्की.

धैर्यनिवासमध्ये शामरावांनी थोडेसे पेंटिंगचे काम केले, पण हळूहळू ते थकत गेले, व चैत्र शुद्ध द्वादशीस (११ एप्रिल १९३८) रात्री त्यांनी देह सोडला.

तो दिवस मॅट्रीकच्या परिक्षेचा पहिला दिवस होता. व आमचे धाकटे बंधू श्रीपाद हे परिक्षेला बसलेले होते, आणि अशा स्थितीत पुढचे पेपर्स लिहिणे कठीणच होते; परंतु कोमामधे असताना देखील ११ तारखेला परिक्षेला जाताना हात उचलून दिलेला आशिर्वाद ह्याच्या बळावर श्रीपादला परीक्षेत यश मिळाले. इतकेच नव्हे तर वडिलांची चित्रकलाही काही प्रमाणात नोकरी संभाळून त्याला हस्तगत करता आली. आणि श्री एन. के. सुब्बाराव नामक साईभक्ताने, जसे शामरावांच्या हातचे श्रीसाईबाबांचे तैलचित्र द्वारकामाईत आहे. त्या साईझची तैलचित्रे स्वखर्चाने त्याच्याकडून करवून म्हैसूर येथे श्रीसाई प्रसन्न मंदिरात १९६० साली व मद्रास येथे मैलापूरमधे श्रीसाई समाज नामक संस्था आहे तिथे १९६६ साली अशा दोन चित्रांची स्थापना करविली. तसेच विलेपारले येथील लोकमान्य सेवा संघाने शामरावांच्या कडून स्वराज्य संस्थापक त्रयी श्री रामदास शिवाजी महाराज व लोकमान्य टिळक यांचे मोठ्या आकाराचे तैलचित्र तयार करवून घेतले होते. पण ते नवीन इमारत तयार होताना नष्ट झाले म्हणून श्रीपाद कडून सेवासंघाने ४०×५० साईजचे तसेच तैलचित्र १९४७ साली करून घेतले व ते आजतागायत गोखले हॉलमधे गॅलरीत टांगलेले आहे. दादर येथील किर्ती कॉलिजने पण त्याच्या हातून डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या संस्थापकांची ९ तैलचित्रे करून घेतली व ती तेथील लायब्ररीमधे टांगलेली आहेत.

आर्ट स्कूलमध्ये शिक्षण न घेता शामरावांनी तैलचित्रकार म्हणून स्वतंत्र आयुष्यक्रम घालविला, पण साधारण १९०३/४ साली मुंबई हायकोर्टाचे चीफ जस्टीस सर लॉरेन्स जैकिन्स ह्यांची पत्नी ही फ्रेंच अकॅडमीची शिष्या होती. तिची काही प्रसंगाने शामरावांशी गाठ पडून त्यांच्या कामाची तिने फार प्रशंसा केली. व स्वतः युरोपियन रंगाचे मिश्रणाची कला शामरावांना शिकविली. त्याचप्रमाणे १९१४ साली पुण्यास टेनिसन कोल म्हणून एक इंग्रज आर्टिस्ट काही महिने मुक्काम करून होता. त्यानेही त्यांच्या कामाची प्रशंसा केली व आपली कामे शामरावांना दाखविली. रंगाची बचत करून काम कसे उठावदार होते ते त्याने शामरावांना सांगितले.

शिरडी येथील द्वारकामाईमधील श्रीसाईबाबांच्या तैलचित्राचे चित्रकार कै. शामराव रामचंद्र जयकर ह्यांचा जन्मवृत्तांत व आयुष्यक्रमाची प्रस्तुत लेखकाच्या आठवणीप्रमाणे समग्र माहिती संकलीत करून साईलीला मासिकाचे संपादक श्री. सदानंद चेंदवणकर ह्यांना सादर करण्यात येत आहे व प्रस्तुत लेखकाला जनतेपुढे आपल्या लौकिकवान वडिलांचे चरित्र उपलब्ध करून देण्याची संधी दिल्याबद्दल श्री. चेंदवणकर यांचे शतशः आभार.



# न्यायमूर्ती श्री. नैहशदभाई पारेख

—श्री. साईनंद

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचा कारभार इ. स. १९६० सालापासून सिटी सिव्हिल कोर्ट मुंबई यांचे मार्फत चालू असून इ. स. १९६८ सालापासून माननीय श्री. एन्. के. पारेखसाहेब न्यायमूर्ती सिटी सिव्हिल कोर्ट मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली संस्थानचे कोर्ट रिसिव्हर काम पहात होते. पण आता श्री. पारेखसाहेब यांची नेमणूक मुंबई उच्च न्यायालयात झाल्याने संस्थानतर्फे गेल्या डिसेंबरात त्यांचा शिरडी येथे यथोचित सत्कार करण्यात आला होता. सत्कार करून श्री. पारेख साहेबांना निरोप दिला असला तरी संस्थानचे व त्यांचे संबंध अखंड मैत्रीचे अतूट असेच आहेत.

श्रीसाईबाबांच्यावर, व संस्थानवर अपरंपार प्रेम करणारे पारेखसाहेब मूळचे गुजराथेतल्या नाडेयादचे. त्यांचा जन्म लंडन येथे २८ जून १९२६ रोजी झाला. त्यांचे वडील कांतीलाल गोकळदास पारेख हे बॅरिस्टर होते. 'लिंकन इन' येथे त्यांचे शिक्षण झाले. नैहशदभाईंच्या मातोश्रींचे नाव उर्मिलाबेन. त्या एकाकाळच्या धाडशी विदुशी होत. त्यांनी १९३० साली विमान विद्येचे शिक्षण घेतले होते. त्या पहिल्या हिंदु वैमानिक होत. बाँबे फ्लाईंग क्लबमधून त्यांनी विमानविद्येचे शिक्षण घेतले होते.

नैहशदभाईंचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण गोवालीया टँक जवळच्या सुप्रसिद्ध फेलोशिप हायस्कूलमध्ये झाले. उच्च शिक्षणासाठी त्यांनी चौपाटीवरच्या विल्सन कॉलेजात नाव दाखल केले व तिथे इंटर होऊन सिद्धार्थ कॉलेजातून ते बी. ए. पदवीधर

व पुढे सरकारी लॉ कॉलेजातून एल. एल. बी. उत्तीर्ण झाले. बी. ए. च्या परीक्षेत इतिहासात त्यांनी विशेष नैपुण्य दाखविले. कॉलेजात असताना एन. सी. सी. मध्ये त्यांनी भाग घेतला होता. तसेच यु. ओ. टी. सी. (युनिव्हरसिटी ऑफिसर्स ट्रेनिंग कोर्स) मध्येही ते दाखल झाले होते व वाढत वाढत 'ॲडज्युकटंट' या जबाबदारीच्या पदापर्यंत ते पोचले. एक हजार सैनिकी विद्यार्थ्यांची जबाबदारी ते एकटे सांभाळू शकत होते. या शिक्षण क्रमातली 'ए' व 'बी' अशी दोन्ही प्रशस्ती पत्रे त्यांना त्यावेळी बहाल करण्यात आली होती. या शिक्षणक्रमासाठी लागणारे अत्यावश्यक गुण तर त्यांचे पाशी होतेच पण त्या जोडीला उंच व मजबूत शरीर यष्टी पण त्यांचे जवळ होती हे विसरून चालणार नाही. कायद्याचा अभ्यास करताना त्यांना 'गुन्हेगारी कायदा' व 'व्यापारी कायदा' या दोन आवडत्या विषयात विशेष प्रगती दाखविली होती.

बी. ए. एल. एल. बी. झाल्यावर श्री. नेहशद भाईनी सिटी सिव्हिल व सेशन कोर्टात तसेच स्मॉलकॉजेस व हायकोर्टाच्या ॲपिलेट विभागात आपली प्रॅक्टिस सुरू केली व याचेच फळ म्हणून की काय त्यांची १-ऑक्टोबर १९६८ रोजी सिटी सिव्हिल व सेशन कोर्टाचे एक न्यायमूर्ती म्हणून नेमणूक करण्यात आली; आणि याबरोबरच श्रीसाईबाबा संस्थान शिरडीच्या कोर्टरिसिव्हरना वेळोवेळी मार्गदर्शन करण्याचेही काम आले. हा खरोखरच एक योगायोग असेच म्हणावयास हवे.

मा. श्री. पारेखसाहेब हे पूर्वीपासून श्रीबाबांचे निस्सीम भक्त असल्याने संस्थानच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सर्वतोपरीने यत्न केले. श्रीबाबांच्या समाधी-मंदिराचा समोवतालचा भाग, द्वारकामाई मशिद, व चावडी यांचे नूतनीकरण, अंतर्गत सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते, भक्तांच्या निवासासाठीची नवी शांतिनिवास इमारत, लेंडी बागेची आकर्षकता वाढविणारी सुधारणा, बागेतील नवे श्रीदत्तमंदिर, सर्वत्र दिवे इ. अनेक बांधकामे व विविध सुधारणा त्यांनी प्रामुख्याने त्यांच्या कारकीर्दीतले रिसिव्हर साहेब श्री. का. सी. पाठक व अलीकडील श्री. काकरेसाहेब यांचे करवी श्रीबाबांचाच आदेश किंवा प्रेरणा या नात्याने करवून घेतल्या. या मागे श्रीसाई-बाबांच्या दर्शनास दूरवरून येणाऱ्या साईभक्तांना शिरडीस आल्यावर मनःशांती मिळावी व त्यांचे इच्छेप्रमाणे दर्शनलाभ, पाठ पूजा इ. घेता-करता यावे हाच उदात्त हेतू होता. त्यांच्या कारकिर्दीत ४० लाखाचे नवीन ८०० माणसे एकावेळी भोजनास बसू शकतील असे प्रशस्त नवीन भोजनालयासह निवासस्थानाची इमारत व २५ लाखाचे भव्य हॉल असलेल्या इमारतीचे बांधकाम सुरु झालेले आहे व ते आता लौकरच पूर्ण होत आहे. लेंडी बागेत, हरीण, मोर, ससे, इ. आणवून दर्श-

नास येणाऱ्या आबाल वृद्धांच्या करमणुकीतही त्यांनीच भर घातली आहे. सारांश संस्थानच्या आजच्या भक्तांचे सुखसोयीने युक्त असलेल्या स्वरुपाचे व भरभराटीचे श्रेय त्यांनाच आहे असे म्हटल्यास चूक ठरणार नाही.

श्री. पारेख साहेब यांनी भारताचा प्रवास केला आहे. हिंदी, मराठी फ्रेंच या भाषा इंग्रजी व गुजराथी बरोबरच ते जाणतात शिकारीची त्यांना आवड आहे. विशेषतः घोड्यावर बसून नेमबाजी करणे त्यांना आवडते. इंग्रजी साहित्यातले शेक्सपियर व मेकॉलि हे त्यांचे आवडते लेखक होत. चरित्रे, राजकीय विषयावरची पुस्तके व धार्मिक वाङ्मय वाचनाचा त्यांचा फावल्यावेळचा उद्योग आहे. श्री. पारेख साहेब श्रीसाईबाबा संस्थानशी जसे संबंधीत होते तसे गणेशपुरीच्या श्रीनित्यानंद आश्रमाचेही विश्वस्त होते. आपल्याला जीवनात श्रीमुक्तानंद बाबांनी चांगले मार्गदर्शन केले आहे असे पारेख साहेबांचे म्हणणे आहे. आपल्याला आध्यात्मिक दृष्टिकोन त्यांचेमुळेच लाभला असे ते सांगतात. गणेशपुरीला आपण तासन् तास ध्यानावस्थेत होतो व त्या अवस्थेतून आपणाला मुक्तानंदानीच जागृत करून दिशा दाखविली असे ते आवर्जून सांगतात.

श्री. एन. के. पारेख साहेबांचा विवाह १९६४ साली झाला. त्यांच्या पत्नी सौ. निर्मलाबेन या पूर्वाश्रमीच्या निर्मला मर्चंट या होत. त्या उत्तमपैकी पोहोणाऱ्या आहेत. अखिल भारतीय पोहोण्याच्या स्पर्धेत त्यांनी अनेकदा भाग घेतलेला आहे व बक्षिसे मिळविली आहेत. श्री. पारेख साहेबांची मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून नेमणूक झाल्याबद्दल २५-१२-७९ रोजी त्यांचा शिरडी येथे संस्थानने भव्य सत्कार केला होता; त्यावेळी संस्थानचे भरभराटीचे श्रेय आपणास नसून प्रत्यक्ष काम करणारे व्यक्तीनाच आहे असे त्यांनी सांगितले होते. श्री. पारेख साहेबांसारख्या गुणी मार्गदर्शकांचा असाच उत्कर्ष होत राहो अशी शुभेच्छा व्यक्त करतो.

---

## सात सूरोमें साईबाबा

● हिंदी चित्रसृष्टीतील उगवते पार्श्वगायक श्री. चंद्रशेखर गाडगीळ यांचा 'सात सूरोंमें साईबाबा' हा बहारदार कार्यक्रम चर्नीरोडवरील हिंदुजा हॉलमध्ये शनि. ता. २ फेब्रु. ८० रोजी रात्री ८-३० वा. सादर करण्यात आला होता. या कार्यक्रमात कवी इकबाल फैज, स्वतःगायक चंद्रशेखर व त्यांच्या पत्नी सौ. रश्मी आणि अन्वर कुरेशी व इतर साथीदार मंडळी ही होती.

# श्रीसाईबाबा आणि संत कबीर

—श्री. चकोर आजगावकर, एम्. ए.
वाय. ११/१७० सरकारीवसाहत
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१

● संत श्री कबीर हा बाबांचा पूर्ववतार होता व व्यंकुशहा (गोपाळस्वामी) यांना अहमदाबादेस सुबागशहा सत्पुरुषाच्या दर्ग्यात कबीराचा जन्म पाथरी परभणीस होणार असल्याचा दृष्टांत झाला व त्यानुसार श्रीबाबांची व गोपाळस्वामींची शेलू येथे गाठ पडली. व्यंकटेशभक्त व्यंकुशहा अर्थात गोपाळस्वामी देशमुख यांनी बाबांना ज्ञान भक्तियोग यांचे (वांझ गाईचे दूध पाजून) प्रतीकात्म रीतीने दान केले. त्यांच्या डोक्यावरील जखमेस आपल्या हाताने फडके बांधून त्यांना एक वीटहि दिली. त्यानंतर ते पूर्वेस गेले. तेथे त्यांचा नाथपंथी फकीर गुरु त्यांना भेटला व त्या दत्त-स्वरूप पुरुषाने त्यांना सहजसमाधीयोग शिकविला. हा फकीर म्हणजे त्याचे सरकार होते. या दत्तरुप फकीराशी नागपूरचे संत ताजुद्दिन हे सत्पुरुष आपली एकरुपता मानीत. बाबाहि त्यांना पूर्वेकडील सोन्याचे झाड समजत.

बाबा १९ व्या शतकाच्या मध्यावर प्रगट झाले. तर कबीर हे पंधराव्या शतकाच्या मध्यावर अवतरले. एका विधवा तरुणीचे निराधार अर्भक मुसलमान कोष्टी दांपत्याने (निमा व निरू या दोघा पतिपत्नींनी) गंगेच्या तिरावरून उचलून घरी आणले व प्रेमाने संगोपिले. **बाबांप्रमाणे आपली मातापितरे जन्म, जातपात धर्म या कशाचीहि निशाणी कबीरानेही पृथ्वीतलावरील भक्तापुढे प्रगट केली नाही. बाबांप्रमाणेच हिंदु मुस्लिम संस्कृतीचे समान संस्कार कबीरावरहि होते. इ. स. १५१८ च्या सुमारास कबीरांनी आपली जीवित यात्रा संपविली. तर श्रीबाबांनी इ. स. १९१८ त प्राणप्रयाण घडविले.** जातिधर्म पंथातीत निर्गुण उपासना व सगुण रामभक्ती कबीर व बाबांचा जीवनातील समानधारा होती. 'श्रीसाई गीतायन' कारानी या दोघांचे साम्य वर्णिताना म्हटले आहे.

**यमुना तिरा वरोनी—आला नवीन वारा ॥**
**श्रीराम-रहिम दोघे—सोत्कंठ मीलनाला ॥**
**निर्द्वंद्व भेदहीन—विणितो कबीर शेले** ॥ शिरडीस साई आले.
**शतधर्म पंथ जाती—येथे समत्व होती**
**श्रद्धेसवे तितीक्षा—वर्षी अखंड शांती**
**सारे प्रपंचभेद—ज्ञानात दग्ध झाले** ॥ शिरडीस साई आले ॥

बाबा अनेक भक्तांना सांगत ' मी गंगेच्या काठी शेले विणीत असे ' पूर्व जन्मी निर्गुण वेदांत शिकविणारे व सुंदर दोहे लिहिणारे कबीराचे हात, गाणारे मुख श्रीसाई अवतारात मूक बनले होते ! मिताक्षरी भाषेत बाबा एक शब्दात वेदांत गुंफीत कबीरानी प्रपंच केला, संत सेवेसाठी पत्नीहि विकली. त्याचे निराकरण कड-कडीत ब्रह्मचर्य पाळून व अवधूत अवस्थेत वावरुन बाबांनी पुढील जन्मात केले असावे, असे दिसते.

दक्षिणेत १२ व्या शतकात रामानुजाचार्यांनी वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन केले. त्याच प्रकारे कबीराचे गुरु श्री रामानंद यांनी उत्तर भारतात १५ व्या शतकात कार्य केले. परमेश्वराकडे जाणारा मार्ग दुर्गम तत्त्वज्ञानाचा नसून तो साधा उत्कट भक्ती-चाहि आहे. रामानुजांनी हा वैष्णव प्रेमपंथ प्रसारिला. पंधराव्या शतकातील उत्तर भारतातील धार्मिक पुनरुत्थानात सुफी संतांच्या गूढवादी प्रेमभक्तीच्या छटा आहेत. **वैष्णव रामभक्तीच्या माधुर्याची सांगड कबीरांनी सुफी प्रेमोल्लासाशी घातली त्याबरोबरच निर्गुण साक्षात्काराचे अनुभवहि या काव्यविहंगाने आपल्या पदात आणि दोह्यात शब्दांकित केले. साक्षात्कारातून कबीर कवी बनले ! परमेश्वराशी सहजैक्याच्या, साध्या सरळ प्रेममीलनाच्या रंगछटानी कबीर भारले होते. कबीरांची वाणी म्हणजे वेदांतिक सत्याचा सोप्या शब्दातील आविष्कार आहे. कबीर जसे अल्लाचे पुत्र होते, तसे रामाचे दास होते !** ते भगवंताला **राम, रघुनाथ, अल्ला, साई** या शब्दांनी हाक मारतात. रुढी, जड यमनियम, कर्मठपणा, अनुष्ठाने, व्रते, योग-यागांचा कबीरांना बाबांप्रमाणे तिटकारा होता. परमेश्वर कबीरांना सर्वत्र दिसे. विश्व हे त्याचे राऊळ होते. **अल्ला मंदिर मस्जिद मध्ये रहात नाही, कैलासात वा काबा येथे नाही. तो हृदयात आहे प्रेमात आहे. देहदंड, संन्यास, उपासतापास यात देव नाही, असे बाबाहि शिकवीत. कबीरांचा ' साई ' विश्वव्यापक होता. त्याचा ' फकीर ' हा अणूरेणूत श्वासाश्वासात भरला होता. हिंदुमुसलमानाना प्रेमाचा गुरुकृपेचा सामायिक धर्म कबीर व साईबाबा या दोघानीहि शिकविला.**

कबीरांची रामभक्ति व बाबांची रामभक्ती ही एक दोघांच्या अद्भुत आत्मिक अद्वैत एकतेची परममंगल धारा आहे. **कबीराच्या श्वासाश्वासात ' राम ' होता. हा रामानंदानी दिलेला रामनामाचा मंत्र होता. बाबा रात्री झोपले की त्यांच्या देहाच्या अणुरेणूतून, त्यांच्या हृदयातून श्रीराम-नामाचा जप ऐकू येत असे, याचा अनुभव त्यांच्या बरोबर मशिदीत**

झोपणाऱ्या समकालिन भक्तांनी घेतला आहे. कबीरानी निषिद्ध अशा गावी देहत्याग केला तर बाबांनीहि निषिद्ध अशा दक्षिणायनात देहाचे शिलंगण केले.

दोघाहि संताच्या समाधीनंतर त्यांच्या देहाची विल्हेवाट लावण्याबाबत हिंदु व मुस्लिमांत वाद झाला. परंतु तो विलक्षणरीत्या मिटविण्यात आला. दोघांच्याहि भक्तांत अनेक धर्मपंथातील असंख्यात भाविक मंडळी असून ती आपसात कोणत्याहि प्रकारचा भेदाभेद मानीत नाहीत.

शिरडीत बाबांनी पदार्पण केल्यावर ते कबीरपंथी साधू आहेत, असे समजूनच म्हाळसापतींनी त्यांना 'आवो सांई' या शब्दात संबोधिले होते. धुळे कोर्टाच्या चौकशी कमीशनपुढे साक्ष देताना श्रीबाबांना प्रश्न विचारण्यात आला कीः—

'बाबा, आपला पंथ कोणता ?'

बाबांनी उत्तर दिले :

'कबीर पंथ !'

ती जात धर्मातीत आत्मशक्ति, ती भक्तोद्धारक स्नेहाळ कृपाशक्ति, ती उत्कट भक्तप्रेम शक्ती अशीच युगायुगात अवतरत असते व भक्त कैवाराचे कार्य अखंड आचरीत असते. तिला कधी कबीर म्हटले जाते, तर कधी साईबाबा !

# ✣ ऑपरेशनविना रोगमुक्ति ✣

—श्री. स. व्यं. कुलकर्णी, कोडोलीकर, एम्. ए.
२४६५ वरुणतीर्थ वेस,
ए वॉर्ड, कोल्हापूर

● मला जानेवारी १९७९ पासून प्रोस्टेट ग्लँड वाढल्याने त्रास होत होता. त्यावर एकमेव खात्रीशीर उपाय म्हणजे ऑपरेशन. दुसरा विश्वासार्ह इलाज नाही. मिरज व कोल्हापूर अशा दोन्ही ठिकाणी डॉक्टर सर्जनना दाखवून तपासून घेतले. सर्वानुमते ऑपरेशन हाच एक रोग मुक्तीचा उपाय. ऑपरेशन तसे लहान थोडक्यात होते—ऑपरेशन नंतर पुष्कळच प्रकृतीत सुधारणा होईल. इत्यादि—मला गेली वीस वर्षे मधुमेह त्यातच अलीकडे गेल्या वर्षापासून हृदयाचा अंजाना पेक्टोरिस– ह सौम्य विकार. त्यामुळे ऑपरेशन नको असे वाटायचे. त्यातच कोल्हापूरचे प्रख्यात हृद्रोगतज्ञ डॉ. एस. के. कुलकर्णी यांनीही ऑपरेशन नको म्हणून सल्ला दिला. म्हणून ऑपरेशनचा विचार तात्पुरता रहित करून डॉक्टरनी दिलेली औषधे घेत राहिलो.

पुढे मिरजेस मिशन हॉस्पिटलमध्ये नेहमीप्रमाणे तपासणीसाठी गेलो असता त्याही डॉक्टरनी ऑपरेशनची आवश्यकता प्रति पाहिली व माझी केस सर्जरी डिपार्टमेंटकडे पाठविली. दुसरे दिवशी संबंधी सर्जननी तपासून फोटो काढणेस (X-Ray) सांगितले. फोटोनंतर सिस्टॉस्कोपी करून नंतर ऑपरेशनबद्दल निर्णय घेऊ म्हणाले. त्याप्रमाणे मी फोटो काढून घेतले. नंतर फोटोसह सर्जनना भेटणेस गेलो. जाताना मी घरी देवताना व श्रीबाबांना नमस्कार करून निघालो. जाताना पत्नी पूजा करीत होती. त्यावेळी तिने श्रीबाबांना नवस केला की डॉक्टरानी ऑपरेशन नको म्हणून सांगावे श्रीगणेश विसर्जन झाले की दुसरे दिवशी शिरडीस तुमचे दर्शनास येऊ.

मी एक्स-रे डिपार्टमेंटकडून फोटो घेऊन सर्जनना भेटलो. त्यांनी फोटो बारकाईने तपासले. मलाही पुन्हा तपासले. बराच विचार विनिमय करून मला पुन्हा बोलावून घेऊन सांगितले की फोटोवरून तुमचे किडनीचे काम व्यवस्थित चालू आहे, व किडनीला अपाय होण्याची काही शक्यता वाटत नाही. त्यामुळे प्रोस्टेट वाढली असली तरी ऑपरेशनची आवश्यकता नाही. तेव्हा आहेत तीच औषधे कमी प्रमाणात घ्या व तीन महिन्यानंतर पुन्हा तपासणीस या.

डॉक्टरांचा निर्णय ऐकताच पत्नीच्या नवसाची आठवण होऊन श्रीबाबांचे स्मरण जाहले. श्रीबाबांना अशक्य काय ? वास्तविक सिस्टॉस्कोपी नंतरच ऑपरेशनबाबत निर्णय व्हावयाचा होता. पत्नी तर आनंदातिशाने वेडीच झाली. ठरल्याप्रमाणे श्रीगणेश विसर्जनाचे दुसरे दिवशी शिरडीस निघालो.

शिरडीचे दर्शनाचा सोहाळा केवळ अवर्णनीय. काकड आरती, अभिषेक, दुपारची आरती, संध्याकाळी प्रवचनादि कार्यक्रम, व शेजारती. सर्व डोळे भरून पाहावा असा सोहाळा. प्रत्येक आरतीनंतर ओंजळभर प्रसाद व उदीचा हौद भरलेला. वाटेल तितकी घ्यावी-खावी व न्यावी. बाबांचा मुख्यप्रसाद उदी. शिरडीत असताना श्रीबाबा नेहमी आपले बरोबर मागेपुढे वावरताहेत असे वाटते. असे आपण म्हणतो पण प्रत्यक्षात खरोखरच ते मागेपुढे असताना दिसतात-तो भास नव्हे खरेच बाबा आपल्याबरोबर असतात.

सिंहस्थ पर्वणी निमित्य शिरडीहून नाशीकला जाणेचा मनोदय होता. पण बाबांच्या आज्ञेनुसार कोपरगावी श्रीगोदामाईत स्नान करून सिंहस्थ पर्वणी साजरी केली व कुलस्वामिनीचे दर्शनास तुळजापुरास आलो.

सिंहस्थाचा उल्लेख येण्याचे कारण त्यावेळीच सिंहस्थाचे दुसरे व तिसरे स्नान होते. नाशिकला बेसुमार यात्रा लोटत होती व देशातून आलेले साईभक्त शिरडीस येत. त्यामुळे शिरडीतही यात्रा खूपच होती. इतकी गर्दी असून इतर देवदर्शनात अनुभवास येणारी धक्का धक्की-गुद्दा गुद्दी-शारिरीक व शाब्दिक चकमकी वगैरे प्रकार अभावाने जाणवतात. तर उलट सर्व यात्रेकरू एकमेकांबद्दल प्रेमाने आदराने व गोड शब्दात बोलत असल्याचे पाहिले. पाळीतून कोणी दंडेलीने पुढे जाण्याच्या खटपटीत नाही. पण एकादा साईभक्त काही गडबडीत असला तर त्याला पुढचे लोक प्रेमाने पुढे जाऊ देत. हा जो एकमेकाबद्दल जिव्हाळा व प्रेमभाव हेच बाबांचे अस्तित्व-जिवंत अस्तित्व.

शिरडीहून आल्यापासून श्रीबाबा छबीफोटो रूपाने आपले बरोबरच आले आहेत ही दृढ भावना असली तरी पुन्हा शिरडीस जाण्याची आतुरता उफाळून येत आहे. त्यासाठी नवस बोलून बाबांचे बोलावण्याची वाट पहात बसलो आहे. लवकरात लवकर बोलवावे ही श्रीचरणी नम्र प्रार्थना.

# सर्व व्यापी परमेश्वर श्रीसाई

—सौ. सिंधू देविदास मुळीक
उंटखाना, अशोक चौक, बस स्टॉप
शिंगणे यांचे घरी, नागपूर.

"ज्या ज्या स्थळी मन जाय माझे
त्या त्या स्थळी हे गुरुरूप तुझे"

● शिरडीचे श्रीसाईबाबा भक्ताचे कृपा छत्र आहे. जीवनातील बऱ्यावाईट घटना घडवून आणून त्यातून मार्गही तेच काढून देतात, व अदृष्यरितीने अलौकीक चमत्कार दाखवून आपल्या लीलेने भक्तांच्या हृदयात दृढ श्रद्धा निर्माण करतात.

आम्ही शिरडीस जाण्याचे ठरविले. मनमाडहून बसने शिर्डीस जाण्यास निघालो. बसमध्ये गर्दी फार होती. उभे राहणेही कठीण झाले होते. आमच्याजवळ लहान मुले व प्रवासात लागणारे सर्व सामानही होते. त्यामुळे कंडक्टरने ह्यांच्या जवळची सुमारे चार पाचशे रुपयांचे कपडे असलेली बॅग घेऊन खाली बाकाजवळ. ठेवली. शिर्डीस उतरून आम्ही खोली केली. आंघोळी करावयाच्या वेळेस आम्हाल-कपड्याच्या बॅगेची आठवण झाली. तेव्हा ती बॅग बसमध्येच राहून गेल्याचे आढळून आले. थोडावेळ आमची मने फारच अस्वस्थ झाली. बसस्थानकावर चौकशी केली असता कुणीच दाद लागू दिली नाही. सामाना अभावी या कुटुंबाचे लक्ष शिर्डीत लागते किंवा नाही. हे पाहण्यासाठी कदाचित् साईबाबांनी ही लीला केली असावी. किंवा आमच्या हातून काही अपराध झाला असावा व त्याची शिक्षा साई-नाथांनी या रूपाने केली असावी. असा समज करून आम्ही श्रीसाई चरणी आमचे मन लावले.

पुढे शिरडीला पाच दिवस राहून शेगावला जाण्यासाठी आम्ही मनमाडला आलो तेव्हा भुसावळकडे जाणारी गाडी तिथे उभी होती. त्याच गाडीने पुढील प्रवास करावा असे यांनी ठरविले. तिकीट काढायला तिकीट घराशी गेलो असता तेथील बाबूने सांगितले की तुमच्यासोबत लहान मुले आहेत तेव्हा या गाडीने न जाता संध्याकाळच्या गाडीने जा. त्यांच्या रूपाने जणू ही आज्ञा साईबाबांनीच आम्हाला केली होती. संध्याकाळपर्यंतचा वेळ कसा काढावा. एकदा बसस्थानकापर्यंत तरी जाऊन यावे. या हेतूने सोबतच्या परिचित बाईजवळ मुलांना ठेवून आम्ही दोघे

बसस्थानकावर गेलो. थोडे भीतभीतच आम्ही बॅगेची चौकशी केली. तेव्हा तेथील बाबूने बॅगमध्ये कोणते सामान होते याची चौकशी केली. आम्ही कपड्यांची व बॅगेची ओळख सांगितल्यावर साहेब आल्यावर कदाचित् आपले सामान मिळेल अशी आशा दाखविली. एक तासानी साहेब आल्यावर आम्ही बॅगेसंबंधी सांगितले असता तुम्हाला इथे कुणी पाठविले ? व इथे कोणी ओळखीचे असल्यास घेऊन या अशी सूचना केली. मी सांगितले इथे साईबाबांशिवाय आमचे कुणीच ओळखीचे नाही. योगायोगाने पाच दिवसापूर्वी ज्या कंडक्टरांनी आम्हास शिर्डीस पोचविले होते. तेच आढळले, व त्यांनी आम्हाला ओळखले. आमच्या विनंतीनुसार त्यांनी अन्य कोणी या बॅगेसाठी मागणी करण्यास आले तर त्याला मी जबाबदार राहीन असे लिहून दिले. त्यामुळे व आमच्या कपड्यांची ओळख दाखविलेल्या अर्जामुळे आमची बॅग आम्हाला परत मिळाली. त्या प्रित्यर्थ साधा चहा सुद्धा घेणे त्या लोकांनी नाकारले. अशा अनोळखी ठिकाणीसुद्धा साईबाबा सामान्य मानवांच्या हृदयात सामावून व सद्बुद्धी देऊन सत्कार्य करायला लावतात; व आपल्या चमत्कारांची छाप भक्ताच्या हृदयात कायमची ठसवून देतात.

भक्तांना प्रवासाचा वारंवार त्रास होऊ नये म्हणून व दर्शनाचा लाभ मिळावा या उद्देशाने दत्तजयंतीला दत्तरूपाने श्रीसाई नागपूर नगरीत अवतरले. या सोहळयात माझ्या परीवारासह भाग घेण्याची सुवर्णसंधी साईबाबांनी आम्हाला मिळवून दिली. याबद्दल साईचरणी शतशः प्रणाम. जया मनी जैसा भाव तैसा अनुभव दाविसी दयाघना.

## 'जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव।'

—श्री. अनिल रिसबूड
२२३ नवी अमृतवाडी, वि. प. रोड गिरगाव.

● एकाद्या भक्ताच्या मनात जर एकादी इच्छा उत्पन्न झाली व ती श्रीबाबांजवळ प्रदर्शित केली असता ते पुरी करणार नाहीत असे कधी होणारच नाही. कारण श्रीबाबा आपल्या भक्तांची सदैव काळजी वहात असतात. बोलून चालून ती कृपेची सावली.

चार-पाच वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. आम्ही पाच सहा मित्र दरवर्षी रामनवमीला शिरडीला जातो. रामनवमीचा उत्सव सुरू होण्याच्या आदल्या दिवशी आम्ही शिरडीला गेलो. सर्व जागा भरलेल्या होत्या. आम्ही आमचे सामान लॉकरमध्ये ठेवले व स्नान वगैरे उरकून अभिषेकासाठी समाधी-मंदिरात जाऊन बसलो. डोक्यात विचार चालू होते की, 'दरवर्षी रहायला जागा मिळते. ह्यावर्षी जागा का मिळाली नाही?' 'अभिषेक झाल्यावर बघू' असा विचार करून गप्प बसलो. अभिषेक झाल्यावर श्री. शिंदे-साहेबाना भेटलो व त्यांनी आम्हाला समाधी-मंदिराच्या वरची एक खोली दिली. अशा रितीने श्रीसाईबाबांनी आमची रहाण्याची व्यवस्था करून दिली.

दुसरे दिवशी उत्सवाचा पहिला दिवस होता. दुपारच्या बाराच्या आरतीला वेळ होता. समाधी-मंदिरात अभिषेक चालू होता. आम्ही सर्वजण खोलीत गप्पा मारीत बसलो होतो. माझा एक मित्र म्हणाला, 'आज बाबांना शिऱ्याचा नैवेद्य असणार.' मी म्हणालो, 'दरवर्षी आपण रामनवमीला शिर्डीला येतो. माझ्या वडिलांची तब्येत बरी नसल्यामुळे मला आई-वडिलांना आणता येत नाही. पण श्रीबाबांचा प्रसाद (शिऱ्याचा नैवेद्य) जरी मला घरी पाठविता आला तरी माझे समाधान होईल. आमच्या गावचे शिर्डीला कुणी येणारे नव्हते. आमच्या गावच्या कुणी ओळखीचा भेटला तर त्याचेबरोबर श्रीबाबांचा प्रसाद पाठवून देईन.' त्यावर मित्र म्हणाला. 'की काही घाबरू नकोस बाबा तुझी इच्छा पूर्ण करतील!' इतक्यात बाराच्या आरतीची वेळ झाल्यामुळे आम्ही सर्व आरतीला गेलो. त्यात आम्ही आमचे बोलणे विसरून गेलो. आरती झाल्यानंतर जेवण्यासाठी रांगेत उभे होतो. आणि समोर पाहिले असता माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. कारण आमच्या गावचा आमच्या शेजारीच रहाणारा एक मुलगा समोरून आमच्या बाजूला येत होता. मला इतका आनंद झाला की मी लगेच त्याला हाक मारून त्याची चौकशी केली. तो दुसऱ्या दिवशीच गावाला जाणार होता. त्याच्या ओळखीच्या माणसाला (एल. आय. सीचा ऑफिसर) शिर्डीचा रस्ता माहीत नव्हता. म्हणून तो त्याला बरोबर घेऊन आला होता. (त्यानी ऑफिसची गाडी आणली होती.) मी लगेच दोन तीन नैवेद्याची कुपने काढून शिऱ्याचा नैवेद्य आणून त्याच्याजवळ दिला, व माझ्या आई-वडिलांना देण्यास सांगितले अशा रितीने माझ्या आई—वडिलांना श्रीबाबांचा प्रसाद घरबसल्या खायला मिळाला मला इतका आनंद झाला की माझ्या डोळ्यातून आनंदाश्रू गळायला लागले.

मी सहज गोष्ट बोलतो काय? आणि ती गोष्ट पूर्ण होते काय? ही सर्व श्रीबाबांचीच लीला! यावरून श्रीबाबा आपल्या भक्तांच्या इच्छा कशा पूर्ण करतात हे दिसून येते.

# 'जया मनी जैसा भाव'....

—श्री. जे. डी. दळवी
१२/२४४ नाडकर्णी पार्क, वडाळा (पूर्व,)
मुंबई ४०० ०३७.

● 'शिर्डीके साई बाबा' चित्रपट प्रदर्शीत झाला, आणि तो पहाण्याचे वेध माझ्या मनाला लागले आगावू रिझर्वेशन करणे मला आवडत नाही. त्यामुळे मनावर उगाचच ताण पडतो. एक रविवार मिळणार. त्यातही काही काम निघाले, तर? शिवाय म्हटलं 'धार्मिक सिनेमा, अशी किती दिवस गर्दी होणार? एक दोन आठवड्यानंतर सहज तिकीटे मिळतील.'

एके दिवशी कचेरीतून लवकर निघालो. परस्पर चित्रपटगृहावर गेलो, आणि पहातो तो 'हाऊस फुल्ल'! मधल्यावारी ही परिस्थीती, तर रविवारी यायलाच नको. पण मनाला समाधान वाटलं. धार्मिक चित्रपट पाहणारे बरेच लोक आहेत तर!

पुढच्या आठवड्यात पुनः प्रयत्न केला. पुनः तोच प्रकार. मनात विचार केला, आपल्याला बाबांचे चरित्र ठाऊक आहे. शिवाय बाबांच्या जीवनावरील जुना चित्रपट आपण पाहिलेला आहे. आपली त्यांच्यावर श्रद्धा आहे. तेव्हा आपल्याला हा चित्रपट पहाण्याची घाई नाही. ज्यांना बाबांचे चरित्र ठाऊक नाही त्यांना हा चित्रपट आधी बघू दे. म्हणजे त्यांचीही बाबांवर श्रद्धा बसेल. बाबांची पण अशीच इच्छा दिसते. असा विचार करून मनात समाधान केलं. त्यानंतर १।२ आठवडे जावू दिले.

नंतर एका रविवारी ३ च्या खेळाला गेलो. बरोबर मुलगी पण आली. म्हटलं रविवार असला तरी खूप दिवस झाल्यामुळे तिकीटे मिळतील. पण हायरे नशीबा! लवकर जाऊनही 'हाऊस फुल्ल' बोर्डाने आमचे स्वागत केले. मुलगी फारच नाराज झाली. मलाही आता वाईट वाटू लागले. माझा धीर खचला, आणि वैफल्याचे अनेक विचार मनात येवू लागले. 'बाबा, माझ्यावर इतके का रागावलात? लेकराची एवढीही इच्छा आपण पुरी करू शकत नाही? आपल्या एवढ्या कृपेलाही मी पात्र नाही का?' अशा तऱ्हेचे अनेक विचार मनात काहूर माजवू लागले. बाबांच्या कृपेला पात्र होण्या इतकी आपल्याकडून काहीच भक्ति होत नाही या विचाराने माझी मलाच शरम वाटू लागली. मी स्वतःलाच दोष देवू लागलो. तिथून परत निघण्याची इच्छा होईना विमनस्क अवस्थेत मी तिथले फोटो पहात रेंगाळू लागलो.

इतक्यात, समोरच्या तिकीटाच्या खिडकीतून एक व्यक्ती माझ्याकडे पहात आहे असे माझ्या लक्षात आले. मीही स्थीर नजरेने तिच्याकडे पाहिलं. तसं तिने मला जवळ येण्याची खूण केली. मी खिडकीजवळ गेलो. एकूण व्यक्तीमत्त्वावरून ती व्यक्ति कोणी तरी 'बड़ी असामी' वाटत होती.

'काय पाहिजे?' तिने विचारले.

'तिकीटे,' मी म्हटले.

'किती?' मी म्हटले 'दोन.'

'या. आत या.'

मी मोठ्या अधीरतेने आत जाऊ लागलो. तो डोअर किपरने दरवाजात अडवलं. मी त्याला खिडकीकडे बोट दाखवून म्हणालो, 'त्यांनी मला आत बोलावलंय.' डोअर किपरने खिडकीकडे वाकून पाहीलं आणि मला अदबीने रस्ता करून दिला. मी दहा रुपयाची नोट पुढे केली. त्याने मला दोन बालकनीची तिकीटे आणि उरलेले पैसे परत केले. मी त्यांचे मनापासून आभार मानले आणि बाजूला जावून पैसे मोजले. पुष्कळ वेळानंतर माझ्या लक्षात आले की त्याने आपल्याकडून फक्त टॅक्स घेतला. मी बाजूच्या डोअर किपरला विचारलं की, ते गृहस्थ कोण आहेत. तो म्हणाला, 'मॅनेजर.' बाबांची लीला पाहून मन भरून आलं.

## भिवंडी येथे श्रीसाईनाथांची प्रतिष्ठापना

भिवंडी, धामणकर नाका, तेली पाडा येथील साईभक्त श्री. चंद्रकांत पाठारे यांच्या पाठारे हाऊस मध्ये श्रीसाईबाबांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा श्री. का. सी. पाठक, माजी कोर्टरिसिव्हर साहेब श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांच्या शुभहस्ते मंगळवार दि. १९ फेब्रुवारी १९८० रोजी सकाळी ११ वा. करण्यात आली. या प्रसंगी श्री. गजाननराव दाभोलकर हे पाहुणे या नात्याने हजर होते. शिरडी येथील पुजारी श्री. डी. पी. भालेराव यांनी वेदमंत्रोपचारे पौरोहित्य केले. दादर येथील साईभक्त श्री. व सौ. चंद्रकांत पुरव व श्री. व सौ. रमाकांत पुरव या बंधुद्वयांच्या मेहनतीमुळे संपूर्ण कार्यक्रम थाटात साजरा झाला. समारंभाला असंख्य स्त्री पुरुष साईभक्तांनी येऊन देवदर्शन केले. श्री. सदानंद चेंदवणकर, कार्यकारी संपादक यांचेही विशेष अतिथी या नात्याने स्वागत केले गेले.

# श्रीसाई दर्शन

—कु. प्रभा भास्कर सावंत.
२/२३ बिसमिल्लाह बिल्डिंग,
रानडे रोड, दादर, मुंबई ४०००२८

● माझ्या संपूर्ण आयुष्यात न विसरता येण्यासारखी ही घटना आहे. तसे माझ्या आजवरच्या आयुष्यात मला अनेक वेळा श्रीबाबांनी आपल्या सामर्थ्याची प्रचिती दिली.

मी माझ्या जन्मापासून आत्तापर्यंत कधीही शिरडीला गेले नव्हते. मला फार दिवस वाटत होते की, एकदा तरी आपण शिरडीचे दर्शन घ्यावे. बऱ्याच लोकांकडून शिरडीचे वर्णन ऐकल्यामुळे शिरडीला जाण्याची इच्छा मनात बाळगून होते. परंतु बाबांच्या मनात मला शिरडी दाखवावी असे आतापर्यंत आले नव्हते त्यामुळे मला शिरडीचे दर्शन झाले नव्हते.

फार दिवस वाट पाहिली व शेवटचा उपाय म्हणून मी दादर टी. टी. च्या बाबांच्या ऑफिसमध्ये एकदा गेले असता बाबांना म्हणाले की, इतके लोक आपल्या शिरडीत रोज येतात व दर्शनाचा लाभ घेतात व मला मात्र इच्छा असूनही एकदा-सुद्धा शिरडीला जाता येत नाही तरी आता तुम्हीच मला एकवार तरी शिरडीचे दर्शन घडवा व माझी इच्छा पूर्ण करा.

आणि काय आश्चर्य, मी बाबांची अशी प्रार्थना केल्यानंतर ८ ते १५ दिवसांनीच माझ्या ध्यानीमनी नसताना वडिल मला माझ्या बहिणीला म्हणाले की, दोघींपैकी एकीने माझ्याबरोबर शिरडीला चला. मला एस. टी. लागत असल्यामुळे ते मला नकोच म्हणत होते. परंतु काही कारणाने तिला जाता येईना म्हणून शेवटी नाईलाजाने मला नेण्याचे ठरले. माझा तर या गोष्टीवर विश्वासच नव्हता कारण ते म्हणाले तरी नेतीलच याची मुळीसुद्धा आशा नव्हती. मी मनात म्हटले, ही सर्व गंमतच चालली आहे. कसले जातोय आपण शिरडीला एवढे कां आपले भाग्य आहे !

परंतु बाबांची करणी अघटीत आहे असे मी बाबांच्या ११ रा व्या अध्यायात वाचले होते (अघटीत येथील फकिराची करणी) याची प्रचिती बाबांना द्यायची होती. दि. ४ जानेवारी' १९७८ रोजी सकाळी वडिलांनी दुपारी जाण्याकरिता तयारी करण्यास सांगितले तरी मी म्हटले खरेच ना ! दुपारी ४ वाजता खरोखरच ते बॅग घेऊन चल म्हणाले व मी यंत्रवत चालू लागले. कारण मला मी स्वप्नात आहे की जागी आहे हेच कळेना.

गंमत तर पुढेच आहे. आम्ही गाडीत बसलो ती एस. टी. नसून लक्झरी बस होती सर्व सोयींनी युक्त अशी. मी तर बस पाहून हरखूनच गेले. प्रवास फारच सुंदर झाला. रात्री आम्ही साकोरीला थांबलो व सकाळी श्री उपासनी बाबांचे दर्शन घेऊन ९ वाजता शिरडीत पोहोचलो व बाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. दर्शन घेताना बाबांच्या या चमत्काराने मी भारावले होते. बाबा किती झटपट प्रचीती देतात याचा मला अनुभव आला. त्यावेळी मला एका गोष्टीची आठवण झाली ती अशी की, एका मनुष्याला देव दर्शनाची इच्छा झाली व तो गावातील साधुंकडे जाऊन मला देवदर्शन घडवा असे म्हणाला त्यावर साधु हसले व म्हणाले ज्यावेळी तुला अंतर्मनापासून देवदर्शनाची तळमळ लागेल त्याचवेळी तुला देवदर्शन घडेल. त्याप्रमाणे मला अंतर्मनापासून श्रीबाबांच्या दर्शनाची तळमळ उत्पन्न झाली तेव्हाच श्रीबाबांनी माझ्या पायाला दोर बांधून माझ्या अपेक्षेबाहेर व अकल्पीतपणे समाधी दर्शन घडविले.

अशीच श्रीबाबांनी माझ्यावर सदोदीत कृपादृष्टी ठेवावी व चित्त त्यांच्या चरणी जडावे हीच प्रार्थना.

जोडोनिया कर चरणी ठेविते माथा ।
परिसावी विनंती माझी सद्‌गुरुनाथा ॥
असो नसो भाव आले तुझिया ठाया ।
कृपादृष्टि पाहे मजकडे सद्‌गुरुराया ॥


## श्रीसाईलीला लेखक-वाचकांना खूष खबर

**नववर्षरंभापासून पृष्ठसंख्येत वाढ; वर्गणीत वाढ**

श्रीसाईलीला मासिकाची वार्षिक वर्गणी एप्रिल ८० पासून १० रु. करण्यात येत आहे व पानांची संख्या ४८ ऐवजी ६४ करण्यात येत आहे. याची जुन्या नव्या वर्गणीदारांनी नोंद घ्यावी. वर्गणी पाठविण्याचा पत्ता- संपादक श्रीसाईलीला, साईनिकेतन ८०४ बी डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई ४०० ०१४ किरकोळ अंकाची किंमत १ रुपया राहील.

# श्रीसाईलीला

## लेखक-कवी सहावे स्नेहसंमेलन–शिरडी १९८०

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीच्या श्रीसाईलीला या मुखपत्राच्या लेखक-कवींचे सहावे स्नेहसंमेलन फेब्रुवारीच्या ९ व १० या तारखांना शिरडी येथे भरविण्यात आले होते. १९७५ झाली अशा स्वरूपाचे संमेलन प्रथमच भरविण्यात आले होते. यंदा सुमारे ५० लेखक-कवींचा मेळावा एकत्र आला व दोन दिवसांचा सोहळा सुव्यवस्थितपणे यशस्वी पार पडला. अखिल भारतीय श्रीसाई समाजाचे अध्यक्ष प. पू. राधाकृष्ण स्वामी उर्फ श्रीसाई पादानंद यांच्या निर्वाण दुःखाची दाट छाया या संमेलनावर सुरूवातीपासून पडली होती.

यंदाच्या वर्षी या संमेलनास हजर रहाणाऱ्या लेखक-कवींवर बंधन घालण्यात आले होते. श्रीसाईलीलेतून गेल्या पाच वर्षात निदान तीन तरी लेख किंवा कविता ज्या साहित्यिक भक्तांच्या छापल्या गेल्या आहेत अशानाच निमंत्रण देण्यात आले होते. जानेवारी १९८० चे अंकात एक विशिष्ट प्रकारचा माहितीचा तक्ता छापण्यात आला होता व तो तक्ता लेखक-कवींनी भरून पाठवावा. अशी विनंती करण्यात आली होती. तीन साहित्याची अट पूर्ण करणाऱ्या अशाच लेखक-कवींना संस्थानतर्फे थेट शिरडीहूनच निमंत्रित करण्यात आले होते. यंदा हे संमेलन लेंडी बागेतील ' साई निवास ' या इमारतीच्या पाठीमागे असलेल्या हिरवळीवर सुंदर मांडव घालून त्यात छान बैठका अंथरुन साजरे करण्यात आले. संमेलनास अध्यक्षा म्हणून कोल्हापुर निवासी श्रीमंत अनुबाई वहिनीसाहेब घोरपडे इचलकरंजीकर या उपस्थित होत्या. श्रीसाईबाबांचे, वयाच्या ७–८ व्या वर्षी दर्शन घेतलेल्या अनुबाईंचे वय सध्या ८० वर्षांचे आहे. त्यांच्या बरोबर त्यांच्या कनिष्ठ कन्या पुण्याच्या सौ. निर्मलादेवी सोहोनी या पण हजर होत्या. श्री. अनंत जयदेव त्रिंतांबर अहमदनगर व डॉ. गजाननराव दाभोलकर मुंबई हे दोन भूतपूर्व अध्यक्ष संमेलनास हजर होते.

संमेलनास मुंबईहून श्री. व सौ. जी. आर. इनामदार, श्री. डी. आर. खडके, श्री. अनिल रसाळ, श्री. रमाकांत पंडित, श्री. विजय हजारे, श्री. माधवराव गोरे, श्री. राधाकृष्ण गुप्ता 'चेतन,' श्री. वसंतराव व सौ. कलावती चव्हाण, श्री. एन. जी. परुळेकर, श्री. व्ही. पी. कुलकर्णी, श्री. प्रभाकर चेंदवणकर, श्री. एम. डी. नायर, श्री. बा. स. फडतरे, श्री. पी. डब्ल्यू. भूतकर, श्री. सुरेश सातपुते; पुण्याहून प्रा. र. श्री. पुजारी, सौ. लीलाताई पुजारी, श्री. जगन्नाथ कुलकर्णी, श्री. दत्तात्रय मोरे,

श्री. व सौ. सांडभोर, श्री. सूर्यकांत गर्जे, श्री. महादेव दत्तात्रय भिडे, सौ. पार्वतीबाई भिडे; पिंपरीहून श्री. व सौ. पोतनीस, लोणावळ्याहून डॉ. सुमती खानविलकर व डॉ. इंदूताई नाईक; नवापूरहून श्री. रमेश चव्हाण, श्री. इसमुख पाटील, धुळयाहून श्री. नागेश मोगलाईकर, श्री. डी. बी. जगत पुरीया, सौ. लीलाताई मराठे, भंडाऱ्याहून डॉ. सौ. मालती राहाटे, उस्मानाबादहून श्री. ग. दे. कुलकर्णी, बिदरहून प्रा. श्री. गुंडेराव पटवारी व श्री. कृष्णा जोशी, इंदूरहून श्री. बापूसाहेब निरखे, श्री. प्रकाश कर्पे, श्री. वामनराव पंडित व सौ. पंडित, अंबरनाथहून सौ. शशिकला रेवणकर व श्री. रामकृष्ण रेवणकर, विरारहून श्री. देसाई, नंदुरबारहून श्री. उज्ज्वल कुलकर्णी, खुद्द शिरडीची श्रीमती लीलाताई गुजराथी, सौ. उषाताई मुळे इ. लेखक-कवी मंडळी हजर होती. डॉ. टी. आर. आनंद हे लेखक तर कलकत्याहून आले होते.

शनि. ता. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वा. या संमेलनाचे उद्घाटन व पाहुण्यांचे स्वागत मा. श्री. क. हि. काकरे साहेब कोर्टरिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांनी केले. त्यानंतर प्रा. र. श्री. पुजारी पुणे यांची कन्या कु. जयश्री हिने स्वागत गीत गाईले. "या बंधूनो ! या भक्तानो ! वंदन या शुभकाळी; माय आपुली प्रिय शिरडीची आशीर्वादा आली" हे तिच्या स्वागत गीताचे सुरुवातीचे बोल होत. या नंतर गतसालातील दिवंगत साईभक्तांना मिनिटभर उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या नंतर लगेच अखिल भारतीय साईसमाजाचे अध्यक्ष प. पू. श्री. राधाकृष्णस्वामीजी यांना श्रद्धांजली वाहाण्यात आली. स्वामीजी गेल्या दोन संमेलनास हजर होते व यंदाही ते येणार होते परंतु साईच्छे पुढे कुणाचेच काही चालत नाही हेच खरे. श्रीस्वामीजींच्या थोरवीबद्दलचे छोटेखानी भाषण कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांनी केल्यावर ऑल इंडिया साई समाज मद्रास व बंगलोर येथून आलेल्या साईभक्त व स्वामी प्रेमी मंडळीनी स्वामीजींना आदरांजली वाहिली. ऑल इंडिया साई समाज मद्रासचे श्री. टी. केशवराव, श्री. आर. नटेशन बंगलोरच्या श्रीसाई स्पिरीच्युअल सेंटरचे कार्यवाह श्री. सी. व्ही. भास्करराव यांनी स्वामीजींना श्रद्धांजली वाहिली. श्री. सी. के. आर. चेट्टी, श्रीचंद राजपाल, के. सुब्बाराव रेड्डी मुंबई, डी. व्ही. लक्ष्मी नारायण मूर्ती, के. कृष्णमूर्ती सिकंदराबाद, आर. राजगोपालन मद्रास, श्री. पुट्टण्णा नागराज राव, श्री. नारायण, श्रीमती भाग्यम्मा, श्रीमती ललिता, एस. पी. नानजुंडा मुदलीयार बंगलोर इ. मंडळी व अनेक भगिनी खास याच कार्यासाठी प्रथमच शिरडीस मुद्दाम आल्या होत्या. संमेलनाच्या सुरुवातीसच त्यांनी स्वामींची प्रतिमा अभंगाच्या सूरावटीत टाळांच्या गजरात संमेलन स्थानी आणली; ती व्यासपीठाचे जवळ अध्यक्षांचे लगतच पुष्पमालांनी सालंकृत अशीच ठेवण्यात

आली होती व दुसऱ्या दिवशी दासनवमीस ती शिरडीच्या श्रीसाई समाधी मंदिरात टांगण्यात आली. प्रा. गुंडेराव पटवारी, प्रा. पुजारी, अनिल रसाळ, प्रकाश कर्पे, एन. जी. परुळेकर, चेतन, इ. नी स्वामीजींना भाषण व काव्य या द्वारा सुमनांजली वाहिली.

यानंतर यंदाचे संमेलनाचे अध्यक्षा व इचलकरंजीच्या भूतपूर्व राणीसाहेब श्रीमंत अनुबाई वहिनीसाहेब घोरपडे इचलकरंजीकर यांचा का. सं. श्री. सदानंद चेंदवणकर यांनी थोडक्यात परिचय करून दिला. नंतर अध्यक्षमहोदयांचे शुभहस्ते श्रीसाई काव्यबहार या खास अंकाचे प्रकाशन करण्यात आले. या प्रकाशनाबरोबर मुलांचे साईबाबा' या संस्थान प्रकाशित सुंदर पुस्तकाची तिसरी आवृत्ती प्रकाशित करण्यात आली. साईलीलेचे एक लेखक कवी श्री. विजय हजारे यांनी साईबाबांच्यावर रचलेल्या काव्यांचा संग्रह 'शिरडीच्या वाटेवर' हा पण श्रीमंत अनुबाईच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला.

या कार्यक्रमानंतर संमेलनास उपस्थित असलेल्या सर्व लेखक-कवींनी आपापला परिचय करून दिला. त्यानंतर दुपारची श्रींची आरती, प्रसाद भोजन विश्रांती झाल्यावर दुपारचे अधिवेशन ठीक ३-३० वा. सुरु झाले. चहापानानंतर परिसंवादाचा एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादाचे उद्घाटन साकोरीच्या श्री उपासनी बाबांच्या सत्शिष्या प. पू. श्रीगोदावरी माताजींनी केले. त्यांचा दिव्य संदेश डॉ. श्री. शांताराम टिपणीस यांनी वाचून दाखविला. "श्रीसाईबाबा हयात असते तर" हा एक व श्रीसाईबाबा व त्यांची शिकवण हा दुसरा असे विषय होते. या परिसंवादात प्रा. गुंडेराव पटवारी. श्री. रमेश चव्हाण, श्री. ना. ग. परुळेकर, श्री. जगदिश देवपूरकर सौ. पार्वतीबाई भिडे, 'इ. नी श्रीसाईबाबा हयात असले तर या विषयावर आपापले विचार प्रदर्शित केले तर श्री. नागेश मोगलाईकर, डॉ. सुमती खानविलकर, श्री. हसमुख पाटील, श्री. अनिल रसाळ, श्री. डी. बी. जगतपुरीया, डॉ. रा. सी. कापडी, श्री. विजय हजारे इ. नी. आपले विचार दुसऱ्या विषयावर उठावदारपणे प्रगट केले. या कार्यक्रमानंतर श्रींची सायं आरती, प्रसाद भोजन झाले. रात्री सौ. कलावती चव्हाण यांचे प्रवचन कीर्तन समाधी मंदिरात झाले. त्यानंतर श्री. डी. आर. खडके इ. नी. आपापली हजेरी श्रीसाईदरबारात पेश केली. इकडे समाधी मंदिराबाहेर प्रभातचा रामशास्त्री हा बोलपट दाखविण्यात आला. तो रात्री १० वाजेपर्यंत चालला. त्यानंतर श्रींची शेजारती झाल्यावर प्रथम दिवसाचा कार्यक्रम संपला.

रविवारी सकाळी ठीक ९-३० वा. संमेलनाच्या तिसऱ्या सत्रास सुरवात झाली. शनिवारी काही अपरिहार्य अडचणीमुळे गैरहजर असलेले श्रीसाईलीला इंग्रजी आवृ-

सीचे का. सं. डॉ. श्री. दि. परचुरे हे पण यावेळी हजर झाले. या दिवशी सकाळी श्रीसाईलीला मासिकाच्या विकासाच्या दृष्टीने लेखक–कवींसाठी खुली चर्चा ठेवण्यात आली होती. या चर्चेसाठी अनेकांनी ठराव सूचनेप्रमाणे अगोदरच कार्यालयात पाठविले होते. लेखक–कवींनी मांडलेले ठराव थोडक्यात पुढील प्रमाणे

**श्री. डी. आर. उर्फ साईनाथ खडके**—१) मराठी अंकातील निवडक लेख भाषांतरीत करून इंग्रजी अंकात छापावेत व इंग्रजी अंकातील चांगले लेख अनुवादीत करून ते मराठी अंकात द्यावेत. हा उपक्रम सुरु करताना २) दर अंकात ५० वर्षापूर्वीची साईलीला असे एक वा दोन पानांचे सदर असावे. त्यामधून ५० वर्षापूर्वीच्या त्या महिन्याच्या श्रीसाईलीला मासिकातील एकादा निवडक उतारा उद्धृत करावा यामुळे जुन्या काळातील परिस्थितीचे अगर त्यावेळच्या साईभक्तांच्या विचारांचे एक आगळे दर्शन होईल. ३) श्रीसाईलीला लेखक–कवीवर संमेलनास येताना एकाच व्यक्तीस बरोबर आणावे असे बंधन घालू नये. सभासदांच्या कुटुंबाचा खर्च करू नये वाटल्यास सवलतही देऊ नये. ४) संमेलनासाठी येणाऱ्या सभासदाना समाधी-पाशीबसून अभिषेक करण्याची सवलत देण्याचा संस्थानने विचार करावा.

**सौ. उषा प्रभाकर मुळे शिरडी**—१) श्रीसाईलीला मासिकात श्रीसाई-बाबांचे मौल्यवान विचार व त्यांची समाजाला शिकवण याबद्दल अगदी थोडक्यात व योग्य माहिती असावी. २) श्रीसाईबाबा हयात असताना त्यांची निस्वार्थ सेवा करणारे जे भक्त होते त्यांची थोडक्यात माहिती मासिकातून द्यावी.

**श्री. रमेश चव्हाण, नवापूर**—१) श्रीसाईलीला मासिकातून प्रसिद्ध झालेल्या कविता-पैकी दशकातील निवडक १० कवींच्या प्रत्येकी १० कविता याप्रमाणे संस्थान-तर्फे एक काव्य संग्रह प्रसिद्ध करावा. २) साईबाबांविषयी आगळे लिखाण करणाऱ्या साहित्यिकाची रचना, लेखन उत्तम असल्यास संस्थानने त्याच्या लेखनाचा सर्व हक्क घेऊन आर्थिक दृष्टया दुबळ्या असलेल्या साहित्यिकाचे लेखन पुस्तकरूपाने प्रसिद्ध करावे. ३) मासिकात वाचकांचे व्यासपीठ तुमचे सामान्य ज्ञान, बाबांचे चमत्कार इ. सदरे सुरू केल्यास भक्तांची जिज्ञासा वाढून प्रचार व प्रसार होईल. ४) संमेलनासाठी येणाऱ्या लेखक कवींना शिरडीच्या परिसराची माहिती व्हावी या दृष्टीने संस्थानने एक दिवस सहल काढावी व संमेलन दोन ऐवजी तीन दिवसांचे असावे. ५) मासिकाचे मुखपृष्ठ ठराविक स्वरूपाचे नसावे प्रत्येकवेळी त्यात बदल असावा.

**श्री. माधवराव गोरे, कुर्ला**—१) संमेलन तीन दिवसांचे असावे.

**डॉ. सुमती खानविलकर लोणावळा**—१) दिवाळी व काव्यबहार अंक हे दोन्ही मोठे असावेत कारण पुष्कळांना त्याचा लाभ घेता येईल. जाहिरातीमुळे अंकास, आर्थिक मदत मिळेल. २) मुखपृष्ठाचे पान थोडे जाड असल्यास त्यावरील चित्रांचा फोटो आल्बम करता येईल. ३) अंकाची किंमत वाढवावी व अंक मोठा करावा म्हणजे लेखकांची निराशा टळेल. ४) १०० रु. २०० रु. ५०० रु. अशा ठेवी स्वीकाराव्यात. १०१ रु. घेऊन तहह्यात वर्गणीदार सभासद करवून घ्यावे. ५) संमेलनास आलेल्यांची जास्तीत जास्त एकत्र रहाण्याची सोय व्हावी.

**श्री. गजानन उर्फ बापूसाहेब निरखे, इंदूर**—१) मासिकातील काही पाने हिंदी साहित्यासाठी असावीत म्हणजे मध्य व उत्तर भारतातील साईभक्त मासिक अधिक आवडीने वाचतील. २) संमेलनास श्रीसाईलीलेने लेखक-कवींना आमंत्रण द्यावे पण त्यांना संस्थेला आम्हास बोलवा म्हणून विनंती करायला लावू नये.

**श्री. विजय हजारे, मुंबई**—संमेलन कमीत कमी ३ दिवसांचे असावे. संमेलनास कवी लेखकांच्या पत्नीप्रमाणे एक दोन मुलांना पण हजर रहाण्यास परवानगी असावी. कारण आमच्या सारख्यांची दोनच छोटी मुले ठेवून येणाऱ्याकडून मुलांवर एकप्रकारे साई माउलीच्या दर्शनाचा लाभ घेता न येण्यासारखा अन्याय करावा लागणार नाही.

**श्री. दत्तात्रय पोतनीस, पुणे**—१) लेखक-कवींनी मुंबई कार्यालयाकडे केलेल्या पत्रव्यवहारास उत्तरासाठी तिकीटे पाठवूनही उत्तर येत नाही तरी का. संपादक यांनी सवडीनुसार उत्तर पाठवावे. २) संमेलन प्रसंगी लेखक-कवी यांनी एक दिवस एक वेळ तरी एकत्र पंगतीत बसून सहभोजनाचा आनंद घ्यावा व शिरडी कार्यालय अधिकारी, संमेलनाचे अध्यक्ष व इतर पाहुणे यांचेसह तो घ्यावा. ३) मासिकाची वा. वर्गणी वाढवावी. ४) लेखक-कवी बैठक चालू असताना चहापान करू नये. कारण त्यामुळे गडबड होते व चालू विषयावरील विचार नीटपणे ऐकता येत नाहीत. चहापान बैठक संपल्यावर करावे.

**श्री. र. श्री. पुजारी, पुणे**—१) श्रीसाईबाबा संस्थानचे न्यायालयधारक श्री. का. सी. पाठक आणि श्री. क. हि. काकरे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीसाईलीलेचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर व डॉ. श्री. दि. परचुरे यांनी नवीन लेखक वर्ग तयार करून श्रीसाईलीलेच्या मराठी व इंग्रजी आवृत्त्यामधील दर्जा वाढविला आहे याबद्दल ही सभा त्यांचे अभिनंदन करीत आहे. २) वर्गणीदार वाढविण्यासाठी श्रीसाईलीलेच्या प्रत्येक लेखक किंवा कवीने स्वतःखेरीज प्रतिवर्षी किमान तीन तरी वर्गणीदार श्रीसाईलीलेस मिळवून द्यावेत.

श्री. **जगदीश देवपुरकर, जळगाव**—१) श्री. सदानंद चेंदवणकर यांना 'रत्नभूषण' पदवी मिळाल्याबद्दल साई साहित्यिकांकडून सत्कार करावा. २) श्रीसाई पत्र मैत्री नवीन विभाग मासिकाद्वारे सुरू करावा. ३) सर्व संमेलनार्थींनी एक दिवस जवळच्या ठिकाणी सहविहार करावा. ४) जे साहित्यिक मासिकातून लिहितात त्यांना संमेलनाचे आमंत्रणाबाबत ५) साई साहित्य अनुभव संबंधीच्या स्पर्धा ठेवण्याबाबत.

श्री. **हसमुख पाटील, नवापूर**— श्रीसाईलीला मासिकाच्या मराठी किंवा इंग्रजी अंकात हिंदी लिखाणासाठी अर्धा भाग ठेवावा.

श्री. **प्रकाश कर्पे, इंदूर**—१) ज्या लेखक-कवींच्या दोनच रचना मासिकातून प्रसिद्ध झाल्या आहेत व तिसरी रचना संपादकांजवळ आहे त्यांना संमेलनात भाग घेता यावा. २) लेखक-कवींना निमंत्रण बंधन सैल करावे. ३) संमेलनात ऐनवेळी ठराव मांडण्याची स्वतंत्रता लेखक-कवींना असावी.

**डॉ. रा. सी. कापडी; कोल्हापूर**—श्रीसाईलीलेचा आकार वाढवावा. जरुर तर वर्गणीपण वाढवावी. संमेलनाचा उपक्रम स्तुत्य आहे.

श्री. **राधाकृष्ण गुप्ता, डोंबिवली**—१) श्रीसाईलीलेची हिंदी आवृत्ती प्रकाशित करावी व ती पण लौकरात लौकर. २) लेखक-कवींच्यावर आपणाबरोबर किती व्यक्ती आणाव्यात यावर बंधन ठेवू नये.

**श्री. एन. जी. परुळेकर, मुंबई**—श्रीसाईलीलेकडे येणाऱ्या मराठी, इंग्रजी हिंदी गद्य पद्य साहित्याची छाननी-तपासणी करण्यासाठी कार्यकारी संपादकांच्यावर एक समिती असावी. ही समिती मासिकाकडे येणाऱ्या साहित्याचे वाचन इ. करून निर्णयाचेबाबतीत का. संपादकाना सांगेल व समितीचा निर्णय का. सं. ना बंधनकारक असावा. २) लेख-कवी इ. साहित्य सिनिऑरिटी प्रमाणे प्रकाशित व्हावे, ३) संमेलनास येणाऱ्या सभासदांना जागा इ. च्या बाबतीत एकता असावी. ४) श्रीबाबांचे भक्ताना आलेले, चमत्कारीक अनुभव छापताना ते अगदीच बेंगरूळ नसावेत याकडे लक्ष द्यावे. ५) दरवर्षी एक निबंध विशेषांक काढावा व विषय बाबां विषयीच असावा.

**श्री. सी. के. आर. चेट्टी, हैद्राबाद**—श्रीसाईलीला मासिकाचा दर्जा भवन्स जर्नल इतका वाढावा यासाठी संपादक मंडळ अधिक बळकट करावे.

श्री. **एम. डी. नायर, घाटकोपर**—इंग्रजी अंकात मुद्रीते सुधारण्यासाठी का. संपादकांनी आमचा उपयोग जरूर करवून घ्यावा.

श्री. **अ. ज. चितांबर**—मासिकाचा आकार वाढवावा व वार्षिक वर्गणी पण वाढवावी.

श्री. **गर्जे, पुणे**–संस्थानची डायरी संमेलनास आलेल्या प्रत्येक लेखकास द्यावी.

**डॉ. इंदू नाईक, लोणावळा**—मासिकाकडे येणाऱ्या लेखाची प्रथम पोच द्यावी व नंतर निर्णय कळवावा.

लेखक-कवींनी मांडलेल्या या ठरावावर दुपारी चर्चा होणार होती परंतु पुरेसा वेळच मिळाला नाही म्हणून म्हणा किंवा दुपारचे सत्र काहीसे उशिरा सुरू झाले म्हणून म्हणा ठरावांवर चर्चेचा व संपादक व कार्यकारी संपादकांची उत्तरे यांचा संपूर्ण कार्यक्रम राहूनच गेला. त्याचप्रमाणे साईबाबांविषयी हवे ते विचारा हा संपूर्ण मनोरंजनात्मक कार्यक्रम आदल्या दिवशीही राहून गेला होता तो रविवारी होईल असे वाटले होते पण तो रविवारीही बाजुलाच ठेवावा लागला.

ठरावा नंतर श्रीसाईबाबा संस्थानमधील विविध खात्यातील कार्यालय प्रमुख यांची ओळख श्री. काकरेसाहेब यांनी करून दिली. श्री. बागवे, मंदिर प्रमुख, श्री. बाकलीवार, भोजनगृह प्रमुख, श्री. शिंदे व श्री. भावसार, निवासस्थाने प्रमुख, श्री. पाटील इंजिनियर, डॉ. जोशी, इस्पितळ, श्री. कुलकर्णी, विद्युतगृह, श्री. कुलकर्णी स्वच्छता विभाग, श्री. शास्त्रीबुवा, दिगंबर जाखडी, श्री. डी. पी. भालेराव पुजारी, श्री. एकनाथ पाटील कोते, संरक्षण इ. चा परिचय करून दिला गेला. कार्यालय अधिक्षक श्री. द. चिं. पाठक साहेब यांचाही परिचय करून देण्यात आला.

यानंतर मा. श्री. काकरेसाहेब यांनी एकंदरीत समारोपाचे भाषण केले. श्री. देवपूरकर व श्री. मोगलाईकर यांनी निरोपादाखल छानदार लावणी व कविता पण म्हटल्या. पुढे डॉ. परचुरे यांनी सर्वांचे आभार प्रदर्शनाचे भाषण केले. यानंतर अध्यक्ष महोदया श्रीमंत अनुबाई वहिनीसाहेब यांचे अध्यक्षीय भाषण झाले. शेवटी अध्यक्षांना शाल व श्रीफल संस्थानतर्फे अर्पण करून त्यांचा सन्मान करण्यात आला. नंतर उपस्थित लेखक–कवींना श्रीफल, चीज ऐवजी हॉलंडचा बेबलेकचा (बेबी स्किम्ड मिल्क पावडर) १ रचली डबा, कीर्तन पंचक हे संस्थानचे प्रकाशन व श्रीबाबांचे छायाचित्र यावस्तू भेटीदाखल देण्यात आल्या.

रविवारी सकाळच्या कार्यक्रमास श्री. ना. ग. परुळेकर बोलण्यास उभे राहिले असताना 'गेल्या वर्षी संमेलनात निष्कारण खोगीरभरती झाली होती ती यंदा साहेबांनी 'बंधन घातल्याने कमी झाली आहे' असे उद्‌गार काढले होते यावरून संमेलनात लगेच वादाचे स्वरूप निर्माण झाले व श्री. परुळेकरांनी असे उद्‌गार काढल्याबद्दल माफी मागावी अशी जोरदार मागणी करण्यात आली. .हा प्रसंग वगळता एकंदरीत संपूर्ण संमेलनाचा कार्यक्रम यथासांग पार पडला असेच म्हणता येईल याबद्दल श्रींना धन्यवाद. शेवटी श्री. श्रीराम सातर्डेकर यांनी भैरवी गाईल्यावर दोन दिवसांचा कार्यक्रम संपला. रात्री दरबारात अनेक साईभक्तांनी आपापली हजेरी लावली व त्यानंतर इंग्रजी आवृत्तीचे का. संपादक डॉ. श्री. दि. परचुरे यांचे

दासनवमी निमित्य श्रीरामदास स्वामींवर प्रवचन झाले. संमेलनास कुमार सुभाष-चेंदवणकर याने बरीच मदत केली, व संस्थानच्या सर्व कर्मचाऱ्यांचेही सहाय्य झाले. दोन्ही दिवसाच्या भोजनाच्या पंगती यंदा भक्तनिवास पहिल्या मजल्यावर पाठीमागचे बाजूस वाढण्यात आल्या होत्या व पंगतीस स्वतः कोर्टरिसिव्हरसाहेब उपस्थित राहून पंगतीचा लाभ सर्वांना दिला. रविवारी दुपारी २ वा. अध्यक्षमहोदयांनी व सौ. निर्मलादेवींनी श्री. व सौ चेंदवणकर यांचे समवेत साकोरी दर्शनाचा लाभ प. पू. माताजींच्या आमंत्रणावरून घेतला. संमेलनात श्रीसाई साहित्यिकांनी श्री. चेंदवणकर यांना ' रत्नभूषण ' मिळाल्याबद्दल सत्कार केला.

# सहावे लेखक-कवी स्नेहसंमेलन-शिर्डी
# ९ व १० फेब्रुवारी १९८०

### अध्यक्षमहोदय—श्रीमंत अनुबाई वहिनीसाहेब घोरपडे इचलकरंजीकर यांचे भाषण

श्री साईभक्त बंधू भगिनींनो,

आज श्रीबाबांचे चरणापाशी आपली सर्वांची भेट होत आहे. ह्याचा आनंद वाटतो आहे. पण ज्या सेवेकरीता मला येथे श्री काकरे साहेब व उभयता संपादक साहेब यांनी पाचारण केले ती सेवा करणेची माझे ठिकाणी योग्यता नसतानाही मी आले आहे ह्याबद्दल आपण सर्व सौम्य दृष्टी ठेवाल अशी आशा करिते. मी कोणी लेखिकाही नाही किंवा मोठी कवयित्रीही नाही. दोन्ही ठिकाणी थोडी कुडबूड केलेली एक साधारण व्यक्ती आहे, पण श्रीसाईबाबांची एक निस्सीम भक्त आहे येवढ्याच एका मोठ्या तिकिटावर मी येण्याचे कबूल केले आहे.

अगदी लहान वयात मी श्रीसाईबाबांना पाहिले वयाचे ७ ते ९ ह्या दोन वर्षातच अनेक वेळा शिर्डीस जाऊन वडील मंडळीचे बरोबर श्री बाबांचे दर्शन घडले. ते एक मोठे सत्पुरुष आहेत व पुष्कळ चमत्कार करतात हे ऐकत होते. आम्ही मुले पण त्यापलीकडे फारसे समजत नसे. साधु सत्पुरुषांची भक्ती करावी व पुजा करावी त्यामुळे इह परलोकी कल्याण होते वगैरे कळणेचे वय नव्हते. आयुष्यात दुःखाचे एकावर एक प्रहार बसल्यानंतर जेव्हा जीवन असह्य झाले व वडीलमंडळींनी मनाचे शांतीसाठी तत्त्वज्ञानाचे ग्रंथ वाचन करणेस उत्तेजन दिले तेव्हाच मनःशांतीसाठी पुन्हा श्री बाबांचे चरणी धाव घेतली ! थिऑसॉफिचे बाळ कडु होतेच पण १९२५ पासून थिऑसॉफिकल सोसायटीची मेंबर झाले व थिऑसॉफिवरची पुष्कळ पुस्तके

वाचली ज्ञानेश्वरी, दासबोध, वगैरे ग्रंथांचे वाचन केले, व त्यामुळे हे खडतर जीवन आतापर्यंत जगु शकले. वेळोवेळी श्रीबाबांनीच संकटाचेवेळी हात दिला अशी दृढ श्रद्धा आहे. १९२९ अखेर दैवाने सर्वात कठोर आघात केला परंतु केवळ सत्पुरुषांचे ग्रंथ वाचन, व त्यांचे चरणी केलेली कळकळीची प्रार्थना ह्यामुळेच संकटातून पार पडता आले असे श्रद्धापूर्वक वाटते. १९३० पासून श्री साईबाबांची प्रतिमा कुलदैवत श्री वेंकटेशाबरोबरच पुजेत ठेवून सर्व जीवनातील कष्टांचे गाऱ्हाणे त्यांचे पायाशी ठेवून व इतरांनाही संकटमुक्तीसाठी त्यांची उदी देऊन त्यांचे कृपेने आज पर्यंत सुखाने व बऱ्याच समाधानाने जीवनाचा हा दिर्घ प्रवास झाला. ज्या ज्या वेळी काही काळज्या अडचणी वगैरेही आल्या त्या त्या वेळी श्रीबाबांचे कळवळून नामस्मरण व उदी लावणे व पोटात घेणे ह्या उपायाने त्यातून पार पडले व इतरांनाही त्या उपायाने गुण यावा म्हणून त्यांचेही संकटाचे वेळी हे उपाय सांगितले व पुष्कळ लोकांची त्यामुळे श्रीसाईबाबांचे चरणी निस्सीम श्रद्धा जडली. गेल्या काही वर्षांचा माझा असा अनुभव आहे की, ह्या नित्याचे जीवनात जेव्हा काही अडचणी असह्य वाटतात तेव्हा जर श्रीसाईबाबांचा कळकळीने धावा केला तर त्यातून काहीना काही मार्ग निघतो व कोणत्यातरी रुपाने मनाला धीर येण्याजोगे त्यांचे आश्वासन मिळते. दुसऱ्यांचे संकटात आपण श्रीबाबांचा धावा केला तरी ते येतात. १९४२ सालातील एक चमत्कार मला स्वतःलाच फार आश्चर्यकारक वाटला व तो इतरांनाही वाटेल म्हणून मी सविस्तर सांगणेचे योजिले आहे. आमचेकडे बरेच वर्षे नोकरीस असलेल्या एका हुजऱ्याला पुष्कळ वर्षे मूल बाळ नव्हते. तो फार चांगला नोकर होता व माझ्या मुलांचे काम फार प्रेमाने व निष्ठेने करीत असे. एकदा तो माझ्या कै. ति. श्री. मातुश्रींचे बरोबर नगरास गेला होता व तेथून मी मागविलेला श्रीसाईबाबांचा फोटो घेऊन आला, तेव्हा मी श्रीसाईबाबांना मनात प्रार्थना केली की'' बाबा ह्या माझ्या इमानी नोकराला एकदा पुत्र संतती द्या, तो तुमचे समाधीपुढे पाळणा बांधील त्यानंतर काही वर्षे गेली. अपत्य नसल्याने त्या नोकराने पुन्हा लग्न करणेचेही २।३ वेळा ठरविले, पण मी काही ना काही निमित्ताने त्याला कामासाठी परगावी पाठवून त्याचे लग्न लांबविले. अखेर १९४२ साली त्याची पहिलीच, बायको गरोदर राहिली व श्रीबाबांची कृपा होणार अशी चिन्हे दिसू लागली. वयाचे ३७ वे वर्षी प्रथम अपत्य होणार म्हणजे जरा काळजीचेच दिव्य असते व म्हणून मी माझे नोकरास कुटुंबाची प्रकृती वरचेवर आमच्या संस्थानच्या नर्सेना दाखवित जा असे सांगितले व प्रसूतीचे वेळीही त्याना ने असे बजावून ठेवले ! मी परगावी जाणार होते, म्हणून सामान आवरणेच्या धांदलीत असतानाच ह्या नोकराला घरून बोलावणे आले, म्हणून तो गेला असे इतर नोकरांनी सांगितले व रात्री झोपणेपूर्वी त्या नोकराने घाबऱ्याघाबऱ्या

घेऊन सांगितले की सरकारी डॉक्टर व नर्स ह्या दोघांचेही म्हणणे असे आहे की त्यांचे कुटुंबास मिरजेला नेणे जरुर आहे! मी श्रीसाईबाबांना हाक दिली व शांतपणे त्याला सांगितले की ' तू घाबरु नकोस, बाबांची उदी घेऊन जा, ती बायकोचे कपाळास लाव व पाण्यातून पोटातही घेणेस सांग, व मोटर भाड्याने ठरवून बायकोला मिरजेस घेऊन जा व डॉक्टरनांही माझा निरोप सांग की तुम्ही बरोबर जा, रात्री १२ ला डॉक्टर या अडलेल्या बाईला व तिच्या नवऱ्याला घेऊन स्पेशल मोटारीने मिरजेस गेले व मी मात्र घरी इचलकरंजीस रात्रभर श्रीसाईबाबांचे नामस्मरण व त्यांच्या आवडत्या आरतीची पारायणे करीत अंथरूणावर पडून राहिले. रात्री २ चे सुमारास मला जागेपणीच एका झगझगीत प्रकाशाचे कमानीतूनच एक अगदी छान बाळसेदार मुलगा रांगत येतो आहे असे दृश्य दिसले, व मी समजले की आता त्या बाईची सुटका सुखरुपपणाने होऊन मुलगा होणार, व ह्या श्रीबाबांच्या आश्वासनाने मी शांत झाले व अगदी स्वस्थपणाने झोपले. दुसरे दिवशी सकाळी उठताच मी एकदा चौकशी केली परंतु तो नोकर परत आला नव्हता व डॉक्टरही परत आलेले नव्हते. नित्यक्रमाप्रमाणे ८॥ नंतर जेव्हा मी बागेत फिरणेस गेले तेव्हा डॉक्टर कडून निरोप आला की सकाळी ६ वाजता नैसर्गिकरीत्या प्रसूती होऊन बाईला ९ पौंड वजनाचा छान मुलगा झाला आहे व दोघेही सुखरुप आहेत!! श्रीबाबांचे लीलेची धन्यता वाटून अंतःकरण गहिवरून आले, व अनेक वर्षापूर्वीसारखे कौतुक वाटले, व पुन्हा पुन्हा त्यांना मनाने हजारो नमस्कार केले! श्रीसाईबाबांनी मला अद्याप कधी प्रत्यक्ष दर्शन देऊन अगर आपली अशरिरी वाणी ऐकवून कृतार्थ केले नसले तरी अनेकदा संकटाचे प्रसंगी कोणत्या ना कोणत्या रुपाने आपली साक्ष दिली आहे, त्यांची शिकवण फार साधी व सोपी असे, आमची वडील मंडळी सांगत असत. सर्व प्राणी ईश्वराचे अंश आहेत, सर्वांचेशी प्रेमाने वागावे, सत्याने चालावे, आपले वाट्यास आलेले कर्तव्य उत्तमरित्या पार पाडून, परमेश्वर सर्वत्र भरलेला, असून तो फार मायाळू आहे ही भावना ठेवून आनंदात रहावे. सत्मार्गाने जीवन जगावे व समाधाने जे मिळेल त्यात सुखाने असावे केव्हाही अन्नाचा अव्हेर करु नये, श्रीकृष्ण परमात्म्याने भगवत-गीतेत सांगितलेप्रमाणे सात्विक आहार करावा व अखंड नामकरण करावे ज्ञानलाल-सेने उद्योग करावा. संतसत्पुरुषांचे पद्धतीप्रमाणे सहज बोलताना साध्या शब्दात ते सदाचाराचे धडे देत व अध्यात्मांची तत्वे मनावर ठसवीत. "साईबाबा" म्हणजे ह्या साडेतीन हात देहातच तेवढा आहे असे समजू नका तो सर्वत्र भरलेला आहे असे पहा हा देह पडला तरी "बाबा" कुठे जाणार नाहीत तुम्ही कोठे ही असा, काहीही करा, मला इथ शिर्डीत बसून सगळे समजते असे म्हणत. या वाक्यात केवढा अर्थ भरलेला आहे! सत्पुरुषांचे चमत्काराने भुलून आपण त्यांचेकडे धाव घेतो परंतु

चमत्कार हीं त्यांचे दृष्टीने अगदीच क्षुल्लक गोष्ट असते, त्यांचे कार्य जनतेला अध्यात्म मार्गावर प्रगती करणेस सहाय्य करणे हे असते व त्याकरिता लोकांनी त्यांच्याकडे आकर्षित व्हावे हा त्यांनी सहज दिलेल्या सहाय्याचा हेतू असावा, जो आम्हां अज्ञ जनाना "चमत्कार" असे वाटते. आपले संकट, सत्पुरुषाचे आशीर्वादाने टळले नंतर आम्ही त्यांनी उपदेशिलेल्या मार्गाने जीवनपथ आक्रमण करुन आत्मोन्नती केली पाहिजे त्यांच्या कृपाछत्राखाली अद्वेष्टा सर्वभूतांना मैत्रः करुण एवच। निर्ममो निरहंकारः सुखदुःखसुखः क्षमी। अशा प्रकारे आनंदाने जीवनातील प्राप्त कर्तव्ये उत्तम रीत्या बजावून त्यांचे चरणी समर्पण करावीत अशीच त्यांची अपेक्षा असावी!

ह्या ठिकाणी आपणापुढे चार शब्द बोलणेचा माझा अधिकारही नसून आपण मला संधी दिली ह्या बद्दल मी आपली आभारी आहे. श्रीबाबांचे आशीर्वाद लहानपणी प्रत्यक्ष मिळाले त्यामुळेच जीवनाचा खडतर मार्ग ओलांडून येथपर्यंत जीवित यात्रा गाठता आली व त्याचेच कृपेने ही अल्पशी सेवा त्यांचे चरणी अर्पण करणेची संधि मिळाली. त्यांची अशीच कृपा सर्वांचेवर राहो अशी प्रार्थना करुन मी आपली रजा घेते—

धन्यवाद!

विद्यमान अध्यक्षा
संमेलन-१९८०

अनुबाई वहिनीसाहेब घोरपडे
इचलकरंजीकर

# श्रीसाईबाबा संस्थानचे—संबंधितांसाठी श्री. क. हि. काकरे कोर्टरिसीव्हर यांचे महत्वपूर्ण पत्र....

### विषयः—शिरडी येथील श्रीसाईबाबांना मंदिरातील समाधीची प्रतिकृति काही ठिकाणी केली जात आहे त्याबाबत.

महोदय,

शिर्डीचे महान् संत श्रीसाबाबा ह्यांनी १९१८ साली महासमाधी घेतली हे आपणांस विदीत आहेच. त्यावेळी त्यांचा पार्थीव देह बुट्टीवाड्यात ठेवण्यात आला व त्यांवर समाधी बांधण्यात आली, ती इमारत हल्ली 'समाधी मंदिर' म्हणून प्रसिद्ध आहे.

ज्या ठिकाणी एखाद्या संताचा पार्थिव देह ठेवण्यात येतो, त्याच ठिकाणी फक्त त्याची समाधी असते. ती जगामध्ये अन्यत्र कोठेही असणार नांही हे उघडच आहे. म्हणून ज्या ठिकाणी सद्‌गुरू श्रीसाईबाबांचा पार्थीव देह शिर्डीत ठेवण्यात आला

आहे त्या समाधी मंदिरातच त्यांची समाधी असणार व इतरत्र कोठेही ती असणार नाही.

श्रीसाईबाबांचे असंख्य भक्त जगभर पसरलेले आहेत आणि ज्या ज्या वेळी शक्य असेल त्या त्या वेळी ते श्रीबाबांच्या दर्शनासाठी शिरडीला येतातच, परंतु जगात विखुरलेल्या साईभक्तांना त्यांच्या त्यांच्या गावातच श्रीबाबांचे दर्शन मिळावे व वाटेल त्यावेळी त्यांची पुजा करता यावी म्हणून ठिकठिकाणी साईमंदिरे बांधण्यात आली आहेत व त्यामध्ये श्रीबाबांची मूर्ती बसविण्यात आली आहे. साईभक्तीच्या प्रसाराच्या दृष्टीने ही अत्यंत स्पृहणीय अशी गोष्ट आहे, परंतु काही ठिकाणी मंदिरात शिरडीच्या मंदिरातील समाधीची प्रतिकृती बांधण्यात आली आहे. तसेच काही ठिकाणी तशा पद्धतीची प्रतिकृति बांधण्याचे घाटत आहे. ही कृती कायद्याविरुद्ध तर आहेच, परंतु शिरडीच्या साईबाबांच्या भक्तांस न शोभणारी व काहीशी चमत्कारीक आहे असे म्हणावेसे वाटते.

शिरडीशिवाय इतरत्र कोठे जर साईबाबांची समाधी बांधण्यात आली तर त्या ठिकाणी श्रीबाबांचा पार्थीव देह ठेवलेला नसल्यामुळे ते कृत्य श्रीबाबांच्या भक्तांची फसवणूक करणारे व शिरडी येथील श्रीबाबांच्या समाधीचा अनादर करणारे ठरेल. कारण पुष्कळ काळ गेल्यानंतर भक्तांच्या मनात असा संदेह निर्माण होईल की श्रीसाईबाबांची खरी समाधी कोठे आहे. सर्व साधारण लोक देखील अशीच शंका घेऊ लागतील व तो एक संशोधनाचा विषय होऊन बसेल.


श्रीबाबांच्या मंदिरांशी संबंधित असणाऱ्या सर्व पदाधिकाऱ्यांस माझी अशी विनंति आहे की त्यांचे मंदिरातील कोणताही भाग कोठल्याही प्रकारे श्रीसाईबाबांच्या शिरडी येथील समाधी मंदिरातील समाधीच्या प्रतिकृतीप्रमाणे भासतो की काय हे त्यांनी तपासून पहावे व तसे दिसत असल्यास त्यात योग्य ते बदल करण्यात यावेत म्हणजे ते शिरडीच्या श्रीसाईबाबांच्या मंदिराच्या समाधीच्या प्रतिकृतीप्रमाणे भासणार नाहीत.

आपल्या मंदिराची सध्याची इमारत कशाप्रकारची आहे व आपण माझ्या प्रस्तुत पत्राची दखल घेऊन काही कार्यवाही केली किंवा काय, हे आपण मला कळविल्यास मी आपला आभारी होईन.

श्रीसाईबाबांचे आशीर्वाद आपणा सर्वांना लाभोत हीच इच्छा.

आपला विश्वासू,<br>
**क. हि. काकरे,**<br>
कोर्ट रिसीव्हर,<br>
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी.

## लेखक-कवी संमेलनातील काही दृश्ये



श्री. क. हि. काकरेसाहेब उद्‌घाटन भाषण करीत असताना



श्री. क. हि. काकरे न्यायालयधारक यांचा श्रीमंत अनुबाईंनी श्रीफळ देऊन सत्कार केला त्यावेळी



श्रीमंत अनुबाई वहिनीसाहेब विद्यमान अध्यक्षा यांचा संस्थानने शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला त्याप्रसंगीचे दृश्य



ा. क. हि. काकरे कोर्टरिसिव्हरसाहेब, डॉ. श्री. दि. परचुरे का. संपादक श्रीसाईलीला
ग्रजी आवृत्ती, श्रीमंत अनुबाई वहिनीसाहेब, सौ. निर्मलादेवी सोहोनी ( वहिनीसाहेब
ंच्या कन्या) सौ. ताराबाई चेंदवणकर, श्री. सदानंद चेंदवणकर का. संपादक श्रीसाईलीला
राठी आवृत्ती व श्री. द. चिं. पाठक साहेब कार्यालय अधिक्षक श्रीसाईबाबा संस्थान शिरडी.
सलेले : कुमार सुभाष चेंदवणकर. छाया—श्री. जगन्नाथ कुलकर्णी, पुणे.

# शिरडी-वृत्त माहे डिसेंबर सन १९७९

या महिन्यात नातळाचे सुट्टीमुळे श्रीसाईनाथाचे दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी फार होती. शाळांच्या, कॉलेजच्या, कारखान्यांच्या सहली बऱ्याच प्रमाणात होत्या.

काही कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे :—

**कीर्तन** :—१) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमी प्रमाणे झाली.

२) ह. भ. प. शंकर तु. हरीदास गाणगापूर यांचे कीर्तन झाले.

३. ह. भ. प. सदाशिव के दसणूरकर धुळे यांचे कीर्तन झाले.

**प्रवचन** :—१) ह. भ. प. लक्ष्मण बुवा वाकचौरे शिरडी.

२) ह. भ. प. जगन्नाथ बुवा वाकचौरे शिरडी.

**भजन, गायन वादन वगैरे** १) श्री. रामानंद महाराज कर्नूल. २) श्री अहमद पठाण साखरवाडी. ३) श्री. शिवाजी तु. धुमाळ शिरडी. ४) श्री. सिद्रामाप्पा धोत्रे, सोलापूर. ५) सौ. सविता सु. गिजरे शिरडी. ६) श्री. बबन द. कुलकर्णी शिरडी. ७) सौ. निर्मला ब. नायडू शिरडी. ८) श्रीसाईबाबा भजनी मंडळ गुंटूर. ९) श्री. रमाकांत रा. मोरवाले मुंबई. १०) श्रीगुरुदत्त रा. शिरोली माहीम मुंबई. ११) सौ. जयलक्ष्मी नटराजन न्यु दिल्ली. १२ सौ. सरस्वती राजाराम दिल्ली. १३) श्री. माणिकराव प्रभूदास हैद्राबाद. १४) श्री. चोखीलाल खेड्ले. १५) सौ. अनुराधा पौडवाल मुंबई. १६) श्री. अरुण पौडवाल मुंबई. १७) श्री. रविंद्र दाते मुंबई. १८) सौ. वत्सला अ. नाड, दादर मुंबई. १९) ए. सुदर्शन हैद्राबाद. २०) सौ. सुधा सु. चापणेरकर अहमदाबाद. २१) सौ. इंदूमती व चौबळ मुंबई. २२) श्री. जगजीतसिंग आनंद न्यु दिल्ली. २३) श्री. अनंत जे. मुडचडकर मुंबई. २४) सौ. मधुवंती मु. मिराशी मुंबई २५) श्री. सीताराम नं. पवार अंधेरी मुंबई. २६) श्री. इंद्रमुखी पुणे. २७) श्री. पद्माकर कुलकर्णी, पुणे २८) कु. विजय मद्रास. २९) श्री. वसंतराव देवळणकर पुणे. ३०) श्री. पंडोपंत सोलापूरकर पुणे.

**श्रीदत्तजयंती**:—सालाबादप्रमाणे समाधीमंदिरात श्रीदत्तजयंती कार्यक्रम झाला. दत्तजन्म कीर्तन संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांनी केले. रात्री विद्युत रोषणाईने सुशोभित रथाची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

**माननीयांच्या भेटी—**

१) मा. श्री. उमराव सिंह, शिक्षणमंत्री, म. प्रदेश, भोपाळ.
२) मा. श्री. मोहिते, पोलीस उपअधिक्षक, अहमदनगर.
३) म. श्री. बाळासाहेब भारदे, भूतपूर्व अध्यक्ष, खादीग्रामोद्योग, महाराष्ट्र, मुंबई.
४) मा. श्री. धर्माधिकारी, स्वीयसचिव, मुख्यमंत्री, महाराष्ट्र, मुंबई.
५) मा. श्री. एम्. एस. पाटील, न्यायाधिश, उच्चन्यायालय, बंगलोर, कर्नाटक.
६) मा. श्री. प्रभाकरन, IAS जिल्हाधिकारी, अ. नगर.
७) मा. श्री. एन्. के. पारेख, न्यायमूर्ति, उच्चन्यायालय, मुंबई.
८) मा. श्री. यशवंतरावजी चव्हाण, (तत्कालिन) उपपंतप्रधान, भारतसरकार नवीदिल्ली.
९) मा. श्री. अण्णासाहेब शिंदे, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस अध्यक्ष, मुंबई.
१०) मा. श्री. पी. भास्करन, आयकर आयुक्त, पुणे.
११) मा. श्रीसंत गुलाबबाबा काटेल, नागपूर.
१२) मा. श्रीसंत नारायण महाराज, कुर्ला मुंबई.
१३) मा. श्री. एम्. देवस्थळे, IAS, आयुक्त, दारुबंदी तथा अबकारी विभाग महाराष्ट्र मुंबई.
१४) मा. श्री. राजगोपाल, वरिष्ठ सेनाधिकारी, सेनाकार्य शाळा, खडकी पुणे.
१५) मा. श्री. व्ही. व्ही. एस. कृष्णमूर्ती, जिल्हान्यायाधिश, हैद्राबाद.
१६) मा. श्री. एम्. पी. लवले, IAS, अध्यक्ष, कर्मचारी निवडसमिती, मुंबई.
१७) मा. श्री. मदनलाल सचिव, कर्मचारी निवडसमिती, दिल्ली.
१८) मा. श्री. एन्. पी. भणगे, प्रांताधिकारी, संगमनेर.
१९) मा. श्रीसंत जगद्‌गुरु रमणसिद्ध, नासिक.
२०) मा. श्री. के. वी. इराणी, लंडन.
२१) मा. श्री. विश्वनाथन, अध्यक्ष, अखिलभारतीय भूविकास संस्था, दिल्ली.
२२) मा. श्री. श्रीवास्तव, कार्यस्थान संचालक, ऑलइंडिया रेडिओ (आकाशवाणी) दिल्ली.
२३) मा. श्री. शिवाजीराव पाचपुते, महाराष्ट्र केसरी, मुंबई.
२४) मा. श्री. आर. के. रथ, IAS, संयुक्तसचिव, भारतसरकार नवी दिल्ली.
२५) मा. श्री. रंगनाथन, IAS, कार्यकारी अधिकारी DPAP, अहमदनगर.
२६) मा. श्री. राणे, सचिव, बांधकाम खाते, महाराष्ट्र, मुंबई.
२७) मा. श्री. बेडस, मुख्य अभियंता, महाराष्ट्र, मुंबई.
२८) मा. श्री. एम्. एन्. चांदूरकर, न्यायमूर्ति, उच्चन्यायालय मुंबई.

२९) मा. श्री. गुमणमल लोढा, मुख्य न्यायाधिश, राजस्थान.

३०) मा. श्री. कुडल, न्यायधिश उच्च न्यायालय, राजस्थान.

३१) मा. श्री. सुधाकर जोशी, IAS, मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, अ. नगर.

३२) मा. श्री. पी. राधाकृष्ण नायडू, उपसंचालक, गुन्हेप्रतिबंधक शाखा, हैद्राबाद.

३३) मा. श्री. डी. सी. अगरवाल, आयकर आयुक्त, मुंबई.

३४) मा. सौ. एम्. व्ही. कोरगांवकर, सहसचिव, अर्थखाते महाराष्ट्र, मुंबई.

३५) मा. श्री. बी. एन्. चौधरी, उपसचिव, कायदा व न्यायाधिकार, महाराष्ट्र मुंबई.

३६) मा. श्री. श्रीधरपंत शिरोडकर सहप्रबंधक, AIRINDIA, सिडनी ऑस्ट्रेलिया.

३७) मा. श्री. अरविंद म्हात्रे, महाप्रबंधक ( प्रशासन ) नौकानयन महामंडळ, मुंबई.

**हवापाणी**—शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही, पहाटे हवेत गारवा असतो.

---

# शिरडी-वृत्त माहे जानेवारी १९८०

या महिन्यात बाहेरगावच्या साईभक्तांची बरीच गर्दी होती. मुंबई, गुजराथ, मद्रास, मध्यप्रदेश. दिल्ली वगैरे ठिकाणाहून यात्रेकरूंच्या व विद्यालयीन मुलांच्या बऱ्याच सहली येऊन गेल्या.

काही कलाकारांनी श्रींच्यापुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :—

**कीर्तन** :-१) संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशीशास्त्री यांची कीर्तने नेहमी प्रमाणे झाली.

२) ह. भ. प. आबाजी पणशीकर मुंबई यांचे कीर्तन.

३) बाल कीर्तनकार कृपासिंधु चं. कुलकर्णी नासिक, कीर्तन.

४) सौ. ललितप्रभा चं. कुलकर्णी नासिक, कीर्तन.

**प्रवचन** :- १) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे शिरडी, प्रवचन झाले.

२) श्री. सुभाषबाबा अकोला. यांचे प्रवचन.

**भजन, गायन वादन वगैरे**:-१) श्री. भोलानाथ रा. समेळ, मुंबई.

२) श्री. सारंगधर नंदकुमार, मुंबई.

३) स्वामी रामानंद साईबाबा मंदिर, कर्जूल.

४) श्री. मधुकर वस्त, मुंबई. ५) सौ. रेणु कौशिक, सिमला.

६) श्री. बाबूराव वि. बांदिवडेकर, मुंबई. ७) श्री. हरिश्चंद्र म. भास्कर, मुंबई. ८) श्रीसाईबाबा भक्त मंडळ, नवापूर. ९) ह. भ. प. विठ्ठल उमाप, मुंबई. १०) श्री. ए. सुदर्शन हैद्राबाद. ११) श्री. मोहन पंडित, संगीतकार सुरत १२) श्री. बिपीनचंद्र के वैद्य, सुरत. १३) सुपर स्टार ऑरकेस्ट्रा मुंबई. श्री. एकनाथ मिराशी, १४) श्री. समर्थ आयरे. १५) श्री. चंद्रकांत रहाटे, १६) श्री. वेताळे मास्तर. १७) श्री. चंद्रकांत तिळवे. १८) श्री. अरुण शिर्के, १९) श्री. अच्चुत पालव. २०) श्री. शिरीस नेवरेकर. २१) श्री. रविकांत आंबेरकर. २२) श्री. श्रीकृष्ण आयरे. २३) श्री. प्रमोद मिराशी. २४) श्री. अविनाश पेडणेकर, २५) श्री. शशिकांत तांबोली. २६) श्री. वसंत बाबूराव. २७) श्री. शरद पांचाळ. २८) श्री. सिद्धार्थ पांचाळ. २९) श्री. सुधीर मालवणकर. ३०) कु. नंदा गोवेकर. ३१) श्री. दिपक तांबे, ३२) श्री. सूर्यकांत तिळवे. ३३) श्री. मधुकर वरळीकर. ३४) श्री. सत्यवान ठाकूर. ३५. श्री. मनोहर धुरी. ३६) श्री. वसंत हिंदरे. ३७) सौ. मंगल सु. आपटे बेळगाव. ३८) श्री. गजानन नाईक, बेळगाव. ३९) डॉ. अशोक ना. सखदेव, बेळगाव. ४०) श्रीसाईनाथ भजन मंडळ परेल मुंबई. ४१) श्री. अबदुल रशीद. ४२) श्रीगोविंद सिंग बघेल. छिंदवाडा. ४३) कु. वरदायिनी द. कुलकर्णी, बेळगाव. ४४) श्रीज्ञान-प्रसादिक भजनी मंडळ, चिंचपोकळी मुंबई.

**स्वराज्य दिन**:—२६ जानेवारी १९८० रोजी प्रजासत्ताक दिनानिमीत्त प्रतिवर्षाप्रमाणे मा. श्री. क. हि. काकरे कोर्टरिसीव्हर यांचे शुभहस्ते. श्रीसाईबाबा मंदिरावरील कळसाजवळ ध्वजवंदन कार्यक्रम झाला. सर्व संस्थान कर्मचारी, सेवक-वर्ग, सन्माननीय पाहुणे, होमगार्डपथक, पोलीस, साईनाथ माध्यमिक विद्यालयातील शिक्षक वर्ग, विद्यार्थी–विद्यार्थीनी, बॅण्डपथकासह उपस्थीत असल्याने कार्यक्रम थाटात साजरा झाला. दर वर्षीप्रमाणे संस्थानतर्फे प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मुलाना खाऊ वाटण्यात आला.

**हवापाणी**:—शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

**माननीयांच्या भेटी** :—

१) मा. सर्वश्री दादासाहेब रूपवते अध्यक्ष, समांतर कॉंग्रेस, महाराष्ट्र.
२) मा. ,, व्ही. सुंदरम्, IAS, व्यवस्थापन संचालक, मॅफको, मुंबई.
३) मा. ,, एस. प्रभाकरन्, IAS, जिल्हाधिकारी, अहमदनगर.
४) मा. ,, भारदे, भूतपूर्व अध्यक्ष खादी ग्रामोद्योग, महाराष्ट्र, मुंबई.
५) मा. ,, सी. मिश्रा, IAS, सहसचिव, उद्योग खाते, महाराष्ट्र, मुंबई.
६) मा. ,, श्रीपतराव बोंद्रे, कृषी राज्यमंत्री, महाराष्ट्र, मुंबई.
७) मा. ,, एच. डी. कपाडीया, नैरोबी.

८) मा. ,, जे. बी. मोहींनानी, पनामा.
९) मा. डॉ. एल. व्ही. गोगटे, जिल्हा शल्यचिकित्सक, अहमदनगर.
१०) मा. ,, आर. एल. प्रदीप, IAS, सहसचिव, महसूल खाते, महाराष्ट्र, मुं.
११) मा. ,, बी. के. तथा बापूसाहेब चौगुले, IAS, महापालिका आयुक्त. मुं.
१२) मा. ,, देव, उपमहा निरिक्षक, पुणे.
१३) मा. ,, के. डी. वैद्य, सभासद, टपाल व तार विभाग, नवीदिल्ली.
१४) मा. ,, वा. कृ. तोरस्कर, महानिरिक्षक, तुरुंग महाराष्ट्र पुणे.
१५) मा. ,, पी. ली. मुथा, जिल्हा न्यायाधिश, जळगाव.
१६) मा. ,, शंकररावजी चव्हाण, खासदार, तथा भूतपूर्व मुख्यमंत्री महाराष्ट्र.
१७) मा. ,, हसमुख उपाध्याय, अन्न, नागरीपुरवठा, तथा परिवहन मंत्री, म. मुं.
१८) मा. ,, एच. आर. चिटणीस, हवाई उपसेनाधिकारी, AV-CM-VM, दिल्ली.
१९) मा. ,, एम्. चेन्नारेड्डी, मुख्यमंत्री, आंध्रप्रदेश.
२०) मा. ,, अजितराव निंबाळकर, IAS, जिल्हाधिकारी, पुणे.
२१) मा. ,, यशवंतराव मोतीराम बिजवे, मिडलसेक्स, इंगलंड.
२२) मा. ,, एन्. जी. भणगे, प्रांताधिकारी, संगमनेर.
२३) मा. ,, पुरुषोत्तम हरी गणेश पाटील, मुख्य विश्वस्त, व्यवस्थापक, गजानन महाराज संस्थान, शेगाव.
२४) मा. ,, संत पुनिताचारीजी महाराज, गिरनार.
२५) मा. ,, कर्नल भोसले, संचालक, सैनिकी महामंडळ महाराष्ट्र, पुणे.
२६) मा. ,, डी. बी. देसाई, विधानसभा सचिव, गुजराथ.
२७) मा. ,, के. टी. राठोड, माजीमंत्री, कर्नाटक, बंगलोर.
२८) मा. ,, जी. सी. पाटील, उपसंचालक, भूमिविभाग, पुणे.
२९) मा. ,, मेहरसिंग चव्हाण, सभासद, विधानसभा अर्जनसमिती, हिमाचल प्रदेश.
३०) मा. ,, एम्. एल. दिलीपराव,
३१) मा. ,, जोगींदर पाल, सभासद, विधानसभा अर्जन समिती, हिमाचल प्रदेश
३२) मा. ,, मिलखराज, ,, ,,
३३) मा. ,, एल. एस. जव्वाल ,,
३४) मा. ,, एन्. के. रस्तोजी ,,
३५) मा. ,, एस डी. पाटील मुख्यकार्यकारी अधिकारी, औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र, मुंबई.

३६) मा. ,, एस. बी. जरगडे, प्रादेशिक अधिकारी, ,, पुणे.
३७) मा. ,, डी व्ही. मथुरे IAS, उपसचिव, महसुल व वनविकास म. मुंबई
३८) मा. ,, प्रसाद, अमहानिरीक्षक, रेल्वेज, जम्मू.
३९) मा. ,, विलासराव पाटील, सहाय्यक आयुक्त, पुणे.
४०) मा. ,, सुधाकरराव जोशी, IAS, मुख्य कार्यकारी अधिकारी अहमदनगर.

## श्रीपाद शामराव जयकर यांचे निधन

आमचे स्नेही आणि श्रीसाईबाबांचे द्वारकामाईतील चित्र चितारणारे नामवंत चित्रकार शामराव जयकर यांचे कनिष्ठ चिरंजीव श्री. श्रीपाद यांचे शनि. ता. १९-२-१९८० रोजी वयाचे ६४ व्या वर्षी निधन झाले. ते श्रीबाबांच्या अंगाखांद्यांवर खेळलेले होते. रविवार ता. ३-२-१९८० रोजी आम्ही त्यांना त्यांच्या 'साई कुटीर' तेजपाल स्किम, ५ वी गल्ली, विलेपारले, मुंबई या निवासी भेटलो होतो. त्यावेळी त्यांनी आपले वडील बंधू श्री शूरसेन यांनी लिहिलेल्या आपल्या वडिलांच्या चरित्रलेखाची स्वतः तयार केलेली हस्तलिखित प्रत दिली होती. तो लेख या अंकात इतरत्र छापला आहे. श्री. श्रीपाद हे एक उत्कृष्ट चित्रकार होते. वडिलांच्या हातची चित्रकला त्यांच्या कुंचल्यात शंभर टक्के उतरली होती. त्यांनी काढलेली असंख्य चित्रे चित्रशौकीनांची दालने भूषवित आहेत. म्हैसूर, मद्रास, पार्ले व दादरच्या कीर्ती कॉलेजातही त्यांची चित्रे टांगलेली आढळतात. लेखातील आपल्या वडीलांचे काढलेले चित्र हे त्यांचेच होय. त्यांचे मागे पत्नी, चिरंजीव व ३ वडील बंधू व अन्य मित्र परिवार आहे.



श्रीसाई मृतात्म्यास शांती व सद्‌गती देवो.

— का. संपादक

# घोषणा

श्रीसाईलीला मासिकाच्या मालकीबद्दल व अन्य तपशीला बद्दल दरवर्षी फेब्रुवारी नंतरच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध करावयाची घोषणा :—

१) प्रकाशनाचे स्थळ ... "साईनिकेतन," ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई–४०० ०१४.

२) प्रकाशनाचा कालावधी ... मासिक

३) मुद्रकाचे नाव ... श्री. पांडुरंग दाजिबा मोरे,
राष्ट्रीयत्व ... भारतीय
पत्ता ... बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स, वडाळा, मुंबई–४०० ०३१.

४) प्रकाशकाचे नाव ... श्री. कन्हय्यालाल हिरालाल काकरे
राष्ट्रीयत्व ... भारतीय
पत्ता ... 'साई निकेतन,' ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई–४०० ०१४.

५) संपादकाचे नाव ... श्री. कन्हय्यालाल हिरालाल काकरे
राष्ट्रीयत्व ... भारतीय
पत्ता ... साईनिकेतन, ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग दादर मुंबई–४०० ०१४.

६) हे पत्र ज्यांच्या मालकीचे आहे त्यांचे व १ टक्याहून अधिक भांडवल धारण करणारे भागधारक यांची नावे व पत्ते ... श्रीसाईबाबा संस्थान शिरडी (धार्मिक व चॅरिटेबल संस्था)

मी, श्री. कन्हय्यालाल हिरालाल काकरे यानुसार असे घोषित करीतो की, वरील तपशिल माझ्या माहिती प्रमाणे व समजुती प्रमाणे सत्य आहे.

क. हि. काकरे
(प्रकाशकाची सही)
कोर्ट रिसिव्हर
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी

मार्च १९८०